# वीजदरवाढीने खिशाला झटका; अधिकृत परिपत्रक जारी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

राज्यातील कोट्यवधी वीज ग्राहकांसाठी सणासुदीच्या तोंडावर धक्कादायक बातमी समोर आली आहे. महावितरणने इंधन समायोजन शुल्काच्या माध्यमातून वीजदरवाढ लागू केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहक, व्यापारी, उद्योगपती आणि शेतकरीवर्ग सर्वच हवालदिल झाले आहेत. ही दरवाढ ऑक्टोबर महिन्यातील वीज बिलांमध्ये लागू होणार असून, प्रति युनिट 35 पैशांपासून 95 पैशांपर्यंत वाढ होणार आहे. महागाईने आधीच कंबर तोडली असताना, या दरवाढीने नागरिकांना अक्षरशः करंट बसल्याची भावना व्यक्त केली जात आहे.



महावितरणने 1 ऑक्टोबर रोजी अधिकृत परिपत्रक जारी करून दरवाढीचा निर्णय अमलात आणला. सप्टेंबर महिन्यातील वीज वापरासाठी हे इंधन समायोजन शुल्क आकारले जाणार आहे. ही वाढ केवळ एकदाच नव्हे, तर पुढील आदेश येईपर्यंत कायम राहणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. महावितरणचा दावा आहे की, घरगुती ग्राहकांवर वाढीचा परिणाम अल्प आहे आणि केवळ ९ पैशांचीच वाढ झाली आहे; पण प्रत्यक्षात ग्राहकांच्या बिलांमध्ये प्रति युनिट 35 ते 95 पैशांपर्यंत वाढ दिसून येणार आहे.

महावितरणकडून सांगण्यात आले आहे की, राज्यातील वाढत्या वीज मागणीमुळे कंपनीला ओपन मार्केटमधून महाग दराने वीज खरेदी करावी लागली. उत्पादन खर्च वाढला, कोळसा आणि इंधनाचे दर वाढले, त्यामुळे इंधन समायोजन शुल्क वाढवणे भाग पडले, असे स्पष्टीकरण दिले गेले. पण प्रत्यक्षात ही दरवाढ सर्वसामान्यांच्या खिशावर घाव घालणारी ठरली आहे. एका मध्यमवर्गीय कुटुंबाच्या बिलात दरमहा 150 ते 300 वाढ होणार असून, उद्योगधंदे आणि व्यावसायिक वर्गावर तर त्याहूनही जास्त परिणाम दिसणार आहे. दरवाढ तात्पुरती असल्याचे आश्वासन दिले गेले असले तरी, सध्या ती कायमचा भार ठरण्याची शक्यता आहे.

अतिवृष्टी आणि ओल्या दुष्काळाने आधीच त्रस्त झालेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आता वीजदरवाढीचा नवा धक्का बसला आहे. शेतपिकांचे नुकसान, सिंचन खर्चात वाढ आणि आता विजेच्या बिलात वाढ, यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था अधिक बिकट झाली आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पाणीपुरवठ्यासाठी मोटर चालवणे महाग झाले असून, लहान व्यावसायिक व दुकानदारांनाही वीज बिलाचा फटका बसतोय. एकीकडे आकाशातून पाऊस आणि दुसरीकडे महावितरणचा करंट, आता शेतकऱ्यांना जगायचे कसे? असा प्रश्न अनेक गावांतून ऐकू येतोय. मराठवाड्यातील जिल्ह्यांत वीजदरवाढीविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत असून, ग्राहक संघटनांकडून आंदोलनाची तयारी सुरू आहे.

दरवाढीच्या निर्णयावर आता राजकीय वातावरणही तापले आहे. विरोधी पक्षांनी या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवत राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. सणासुदीच्या काळात वीजदरवाढ करून सरकारने सामान्य नागरिकांवर अन्याय केला आहे.

इंधन समायोजन शुल्काच्या नावाखाली लोकांच्या खिशाला कात्री लावली जात आहे, अशी टीका विरोधकांनी केली आहे. दरवाढ मागे घेण्यासाठी आणि इंधन समायोजन शुल्काच्या पुनर्विलोकनासाठी ऊर्जामंत्र्यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे. दरम्यान, महावितरणकडून भविष्यात दर कमी होतील, असा दावा केला असला, तरी ग्राहकांना त्याचा फारसा आधार वाटत नाही.

# शक्ती चक्रीवादळाचे राज्यावर सावट




कोकणात सतर्कता, मराठवाड्यात चिंता

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या शक्ती या चक्रीवादळाने राज्यातील हवामान विभाग आणि प्रशासन दोन्हीही सज्ज झाले आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, हे वादळ पुढील काही तासांत अधिक तीव्र रूप धारण करण्याची शक्यता आहे. कोकण किनारपट्टीवर आधीच दोन नंबरचा बावटा म्हणजेच धोक्याचा झेंडा दाखवण्यात आला असून, समुद्रकिनाऱ्यालगतच्या सर्व बंदरांवर मच्छीमारांना खोल समुद्रात जाण्यास मनाई करण्यात आली आहे.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर जिल्ह्यांत प्रशासन हाय अलर्टवर आहे. समुद्रात 4 ते 5 ऑक्टोबर दरम्यान ताशी 60 किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मुंबई, रायगड, तसेच कोकण किनाऱ्यावरील अनेक भागात वादळी पावसाची शक्यता असल्याने राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने सर्व यंत्रणा सज्ज ठेवल्या आहेत.

वादळाचा केंद्रबिंदू जरी अरबी समुद्रात असला तरी, त्याचा अप्रत्यक्ष परिणाम मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागावरही दिसू शकतो, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून मराठवाड्यात हवामानात आर्द्रता वाढलेली असून, बीड, लातूर, परभणी, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. वादळामुळे निर्माण होणाऱ्या वाऱ्याच्या दिशाबदलामुळे येत्या 48 तासांत या भागांमध्ये हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकांची योग्य काळजी घ्यावी, काढणीच्या टप्प्यात असलेल्या सोयाबीन आणि कापूस पिकांचे संरक्षण करावे, अशी सूचना कृषी विभागाने केली आहे. कोकणात प्रशासनाने सर्व पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

# ओबीसींचा आवाज दाबला तर महाराष्ट्र पेटेल

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ५ :

राज्यातील ओबीसी राजकारण पुन्हा पेट घेण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. मुख्यमंत्र्यांच्या ओबीसी नेत्यांच्या बैठकीला स्वतःला बोलावले गेले नाही, या कारणावरून ओबीसी नेते लक्ष्मण हाके संतप्त झाले असून त्यांनी आज जेजुरीमधून आंदोलनाची हाक दिली आहे. ओबीसींच्या अस्तित्वाचा, सन्मानाचा आणि अधिकाराचा प्रश्न आता टोकाला गेला आहे, असे ठणकावून सांगत हाके यांनी जेजुरी गडावरून ओबीसींच्या नव्या लढ्याची तळी उचलण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. राज्यभरातील समाजबांधवांना



त्यांनी जेजुरी गडावर या, लढा एकत्र सुरू करूया असे भावनिक आवाहन केले आहे.

मुंबईत नुकतीच मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत ओबीसी नेत्यांची बैठक झाली. मात्र, या बैठकीला लक्ष्मण हाके यांना आमंत्रण देण्यात आले नाही.

## लक्ष्मण हाके यांचा इशारा

त्यामुळे ओबीसी समाजातील अनेक गटांमध्ये नाराजी पसरली आहे. हाके यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, ज्या समाजासाठी आपण रस्त्यावर झटतो, त्याच समाजाच्या नेत्यांच्या बैठकीत आमचं नाव घ्यायचंही धाडस सरकार करत नाही. हीच खरी जातीय अन्यायाची व्याख्या आहे. त्यामुळे त्यांनी आज जेजुरीतून आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली. राज्यातील विविध जिल्ह्यांतून ओबीसी तरुण, महिला आणि समाज नेते जेजुरी गडावर दाखल होत असून, या मेळाव्याला हजारोंच्या संख्येने गर्दी होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांनीही मुख्यमंत्र्यांना इशारा दिला आहे. सरकारने जातीवादी सल्लागारांचं ऐकू नये, अन्यथा परिणाम गंभीर होतील, असे जरांगे पाटील म्हणाले. त्यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, सर्व समाजांना न्याय द्या, पण एका समाजाच्या दबावाखाली अन्य समाजाचे हक्क हिरावून घेऊ नका. जरांगे यांच्या या वक्तव्याने ओबीसी नेत्यांमध्ये संभ्रम आणि संताप दोन्ही निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील आरक्षणाचे समीकरण आणखी गुंतागुंतीचे झाले असून, पुढील काही दिवसांत राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता आहे.

# ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ५ :

आयपीएस अधिकारी असल्याची बतावणी करुन महात्मा गांधी रस्त्यावरील एका पादत्राणे विक्री दुकानात चोरी करुन पसार झालेल्या मायलेकींना लष्कर पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून पादत्राणे, तसेच इमेटिशन ज्वेलरी असा ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी मिनाज मुर्तजा शेख (वय ४०), तसेच तिची मुलगी रिबा मुर्तजा शेख (वय १९, दोघी रा. रा. बुर्ज अल मजार्ना सोसायटी, कोंढवा) यांना अटक करण्यात आली. याबाबत आझम इक्राब शेख (रा. भवानी पेठ, पुणे) यांनी लष्कर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

शेख यांचे महात्मा गांधी रस्त्यावर पादत्राणे विक्रीचे दुकान आहे. १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी मिनाज आणि तिची मुलगी रिबा या खरेदीसाठी दुकानात आल्या. मिनाजने आयपीएस अधिकारी बतावणी करुन पोलीस दलाचे बनावट ओळखपत्र दाखवले. त्यानंतर विवाह समारंभ असल्याचे सांगून त्यांनी दुकानातून महागडी पादत्राणे खरेदी केली. त्यानंतर पोलीस आयुक्तालायात कामगाराला पाठवा.

# बाळासाहेबांविषयी अपशब्द सहन करणार नाही : संजय राऊत



**मुंबई :** भुषण गवई यांनी राजीनामा देत सरन्यायाधीश पदी नेपाळी माणूस आला आहे का? गवई यांचा राजीनामा झाल्यावर राष्ट्रपतींनी सर-न्यायाधीशपदी नेपाळी माणसाला नेमले आहे का?, अनिल परब हे विधान परिषदेचे सदस्य आहेत, वकील आहेत शिवसेना नेते आहेत. परबांनी दिलेल्या माहितीवर पत्रकारांनी संशोधन केले पाहिजे. बाळासाहेब ठाकरेंच्या जीवावर ज्यांनी आयुष्यभर खाल्ले ती लोकं आज त्यांची विटंबना करत आहेत, नारायण राणेंनी त्यांच्या पोरांना आवरले पाहिजे, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. खासदार संजय राऊत म्हणाले की, नारायण राणेंनी त्यांच्या पोरांना आवरले पाहिजे. ते मंत्री असतील त्यांच्या घरी सत्ता येते आणि जाते पण अशाना लोकं त्यांना रस्त्यावर मारतील. रामदास परब यांच्या पत्नीला जाळण्याचा प्रयत्न झाला का या मुद्द्याची चौकशी झाली पाहिजे. बाळासाहेब ठाकरेंचे नाव घेण्याची तुमची लायकी आहे का? असे म्हणत रामदास कदम यांच्यावर निशाणा साधला आहे. परबांकडे अजून बराच साठा आहे, तुम्हाला बाहेर फिरता येणार नाही. कदमांवर बोलण्याइतके ते मोठे नाही.

# बदलापुरात माजी नगरसेवकाचे पुन्हा पक्षांतर

■ महासागर प्रतिनिधी,
बदलापूर, दि. ५ :

शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असा प्रवास करत कुळगाव बदलापूर नगरपालिकेचे माजी नगरसेवक शैलेश वडनेरे यांनी रविवारी भाजपात प्रवेश केला. विशेष म्हणजे पूर्वाश्रमीचे शिवसैनिक असलेले वडनेरे शहरप्रमुख वामन म्हात्रे यांच्याशी वाद झाल्याने शिवसेनेतून बाहेर पडले होते. त्यानंतर २०१९ मध्ये त्यांनी विधानसभेची तयारी केली. २०२४ विधानसभा निवडणूक त्यांनी अपक्ष म्हणूज लढवली. भाजपचे आमदार किसन कथोरे यांचा यात विजय झाला होता. विशेष म्हणजे रविवारी आमदार किसन कथोरे यांच्याच उपस्थितीत वडनेरे यांनी भाजपात प्रवेश केला. वडनेरे पालिका निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.

एक अभ्यासू नगरसेवक म्हणून ओळख

शैलेश वडनेरे भाजपात



असलेले शैलेश वडनेरे यांनी २०१९ वर्षात विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली होती. त्यापूर्वी वडनेरे शिवसेनेचे नगरसेवक होते. सप्टेंबर २०१९ मध्ये त्यांचा शिवसेनेचे शहर प्रमुख वामन म्हात्रे यांच्यासोबत वाद झाले होते. त्या वादातून वडनेरे यांच्या कार्यालयावर हल्लाही झाला होता. त्यावरून म्हात्रे बंधूंवर बदलापूर पूर्व पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर वडनेरे आणि म्हात्रे यांच्यातील संघर्ष वाढतच राहिला होता. अखेर वडनेरे यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला. विधानसभा निवडणुकीत अधिकृत पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्याने नंतर वडनेरे यांनी राजकारणापासून अंतर ठेवले. २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी वडनेरे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष बनले होते. मात्र निवडणुकीपूर्वी शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आलेल्या सुभाष पवार यांना उमेदवारी मिळाली. त्यामुळे वडनेरे नाराज झाले होते. त्यांनी पुढे बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लढवली होती. मात्र त्यांचा पराभव झाला. या काळात त्यांनी विद्यमान आमदार किसन कथोरे यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित करत प्रचार केला होता. विधानसभेनंतर ते पुन्हा शिवसेनेत प्रवेश करतील अशी अटकळ बांधली जात होती. मात्र तसे झाले नाही.

शैलेश वडनेरे यांनी ज्यांच्याविरुद्ध निवडणूक लढवली त्या आमदार किसन कथोरे यांच्याच हस्ते भाजपात जाहीर प्रवेश केला. यावेळी त्यांच्या समर्थकांनीही प्रवेश घेतला. आगामी पालिका निवडणुकीत उतरण्याची तयारी यावेळी वडनेरे यांनी बोलून दाखवली. माझ्या पायगुणाने भाजपचाच नगराध्यक्ष बदलापुरात निवडून येईल, अशी भावनाही यावेळी वडनेरे यांनी व्यक्त केली.

# रामदास कदम-अनिल परब यांच्यात वाद पेटला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :

राज्याच्या राजकारणात शिवसेनेच्या दोन्ही गटांमधील वाद पुन्हा चिघळला आहे. ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी शनिवारी माजी मंत्री रामदास कदम यांच्यावर धक्कादायक आरोप केले. परब यांनी दावा केला की, 1993 साली कदम यांच्या पत्नी ज्योती कदम यांनी जाळून घेण्याचा प्रयत्न केला होता, आणि त्या प्रकरणाची पुन्हा चौकशी होणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर, या घटनेचा पूर्ण तपास व्हावा म्हणून कदम यांची नार्को टेस्ट व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली.

कदम यांच्या घरात त्या दिवशी नेमकं काय झालं? पत्नीने स्वतःला जाळून घेतलं की तिला जाळण्यात आलं? असा थेट प्रश्न अनिल परब यांनी उपस्थित केला. तसेच बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनासंदर्भात कदम यांनी केलेले वक्तव्य धादांत खोटं असल्याचं परब यांनी स्पष्ट केलं. या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, रविवारी कदम यांच्या पत्नी ज्योती कदम यांनी स्वतः माध्यमांसमोर येऊन या सर्व आरोपांवर प्रत्युत्तर दिलं.

रविवारी प्रथमच माध्यमांसमोर आलेल्या ज्योती कदम यांनी भावनिक शब्दांत प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या, अनिल परब यांनी काल जे आरोप केले, ते पूर्णपणे खोटे आहेत. त्यावेळी आम्ही इतके श्रीमंत नव्हतो की आमच्याकडे गॅस सिलेंडर असेल. मी स्टोव्हवर स्वयंपाक करत होते, आणि त्या वेळी माझ्या साडीचा पदर स्टोव्हला लागून जळला. त्यामुळे आग लागली. माझ्या नवऱ्याने मला वाचवण्यासाठी धाव घेतली. त्यांचे हात देखील भाजले. त्यांनीच मला रुग्णालयात नेलं आणि नंतर माझ्या उपचारासाठी परदेशातही नेलं. त्यामुळे आम्हाला बदनाम करू नका, आम्हाला यामुळे मानसिक त्रास होतो आहे, असं त्या म्हणाल्या. जे आरोप झाले आहेत ते केवळ राजकीय हेतूने केले गेले असून, त्या काळातील सत्य परिस्थिती पूर्णतः वेगळी होती.

# नाशिकहून दिल्लीसाठी दिवसातून आता दोन वेळा विमानसेवा

**नाशिक :** नाशिक-दिल्ली ही आठवड्यातून तीनच दिवसांवर मर्यादित करण्यात आलेली विमानसेवा आता पूर्ववत करण्यात आली असून ही सेवा आता दररोज दिवसांतून दोन वेळा उपलब्ध असणार आहे. त्यामुळे नाशिक दिल्ली प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा फायदा होणार आहे. नवी दिल्ली विमानतळावरील Ruafway (10/28) या धावपट्टीचे काम १५ जूनपासून सुरू करण्यात आल्याने नाशिक-नवी दिल्ली विमानसेवा रोजऐवजी आठवड्यातून तीनच दिवस इतकी कमी करण्यात आली होती. यामुळे नाशिकहून दिल्लीला जाणारे पर्यटक, नियमितपणे ये-जा करणारे व्यावसायिक यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत होती. या अनुषंगाने राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री किनेझारापू राममोहन नायडू यांना १२ जुलै २०२५ रोजी पत्र लिहून नाशिक-दिल्ली विमान सेवा पुन्हा पूर्वीप्रमाणे सुरू करण्याची मागणी केली होती. सप्टेंबर 2025 मध्ये अअकमुख्यालय, नवी दिल्ली येथे 27 ऑक्टोबर 2025 ते 29 मार्च 2026 या वेळापत्रकासाठी स्लॉट्स निश्चित करण्याची बैठक होणार होती. यात विमान कंपन्या, विमानतळ ऑपरेटर आणि नागरी उड्डाण क्षेत्रातील घटक सहभागी होणार होते. या बैठकीत नाशिक-दिल्ली विमानसेवा पूर्ववत करणे हा विषय समाविष्ट करावा, तसेच ही सेवा मध्ये पुन्हा सुरु करून दररोजची विमान सेवा चालू करावी, अशी मंत्री छगन भुजबळ यांची मागणी होती. आता नवी दिल्ली विमानतळावरील धावपट्टीचे काम पूर्ण झाल्याने इंडिगो विमान कंपनीकडून २६ ऑक्टोबरपासून दिल्लीसाठी दररोज दोन वेळा विमानसेवा सुरु करण्याची घोषणा करण्यात आली आहे.

# चेंबूरमधील जुगाराच्या अड्डयावर पोलिसांची कारवाई

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ५ :

## ३३ जण ताब्यात

चेंबूर (पूर्व) परिसरातील वसंतविहार कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये सुरू असलेल्या जुगाराच्या अड्डयावर पोलिसांनी धडक कारवाई करीत ३३ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी १.५ लाख रुपयांची रोख रक्कम आणि जुगाराचे सर्व साहित्य जप्त केले. याप्रकरणी आरसीएफ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ४, ५ आणि महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ सह कलम ६५ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम २०१९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. हे प्रकरण पुढील तपासासाठी कक्ष ८ कडे वर्ग करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीच्या धारे कक्ष - ८ मधील अधिकारी व अंमलदारांनी वसंतविहार कमर्शियल कॉम्प्लेक्समधील जुगाराच्या अड्डयावर छापा टाकला. यावेळी १ जुगार अड्डा चालक, १ कॅशिअर, पैज लावणारे ७ जण व जुगार खेळणारे २४ जण अशा एकूण ३३ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तसेच जुगाराच्या अड्यावरून दीड लाख रुपयांची रोख रक्कम, ३ कोटी ३० लाख १ हजार ४०० रुपयांचे जुगाराचे साहित्य, आर्थिक व्यवहाराकरीता ठेवलेले ५ हजार रुपयांचे पीओएस मशीन आणि १० हजार रुपयांची विदेशी दारू असा एकूण ३ कोटी ३१ लाख ६६ हजार ४०० किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास कक्ष-८ चे सह पोलीस निरीक्षक संग्राम पाटील करीत आहेत.

# तरुणाच्या डोक्यात दगड घालून खून

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ५ :

वादातून तरुणाच्या डोक्यात दगड घालून खून करण्यात आल्याची घटना नगर रस्त्यावरील वाघोली भागात रविवारी पहाटे घडली. या प्रकरणी वाघोली पोलिसांकडून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. बादल शेख (वय २४, रा. खराडी) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी वाघोली पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# पुण्यामध्ये शंखनादाचा विश्वविक्रम

## एकाच वेळी एकाच ठिकाणी झालेल्या आविष्काराची वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडियामध्ये नोंद



जानेवारीमध्ये गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करण्याची तयारी सुरू करा. आध्यात्मिक साधना हा समाधानाचा प्रकार आहे. शंखनाद करण्याने आध्यात्मिक साधना होते. शंखातून निर्माण होणारा ध्वनी ही एक साधना आहे.
**चंद्रकांत पाटील, उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री**

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ५ :

पारंपरिक आणि अध्यात्मिक महत्त्व जपत स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर रविवारी झालेल्या विशेष सोहळ्यात विविध वयोगटातील तब्बल एक हजार १११ हून अधिक शंखवादकांनी एकत्र येत सामूहिक आविष्काराद्वारे सर्वांना मंत्रमुग्ध केले. एकाच वेळी एकाच ठिकाणी झालेल्या शंखनादाच्या अनोख्या मंगलमय नादाच्या विश्वविक्रमाची वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडियामध्ये नोंद झाली.

हिंदुस्थानातील पहिले शंखवादकांचे पथक असा लौकिक असलेल्या केशव शंखनाद पथकाच्या वतीने शंखवादकांचा विश्वविक्रम सोहळा आयोजित करण्यात आला होता. सात नादमय आवर्तनांद्वारे शंखवादकांनी भक्तीचे सूर निर्माण केले. ब्रह्मनाद, सप्तखंड, अर्धवलय, तुतारी, पूर्णवलय, सुदर्शन आणि मुक्तछंदनाद अशी सात आवर्तने शंखवादनातून सादर करीत तब्बल एक हजार १११ हून अधिक शंखवादकांनी हा विश्वविक्रम केला. प्रत्यक्षात एक हजार ४०० शंखवादक सहभागी झाले होते.

राष्ट्रीय महाकाल सेनेचे अध्यक्ष महंत योगी रोहतास नाथ महाराज, डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर, उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, विश्व हिंदू परिषदेचे प्रांतमंत्री किशोर चव्हाण, अतिरिक्त पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, ढोल-ताशा महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर, गायक अवधूत गांधी, दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर, किरण साळी, छत्रपती राजाराम मंडळाचे अध्यक्ष युवराज निंबाळकर, सनिकेत ग्रुपचे रवींद्र वाणी, अविनाश वाणी, नीलेश पूरकर, बालाजी ग्रुपचे अनिल चितोडकर, नितीन चितोडकर, भूषण वाणी यांच्यासह केशव शंखनाद पथकाचे संचालक रणजित हगवणे, संजय ठाकूर, काळूराम डोमले, सुहास मदनाल, प्रभाकर चव्हाण, शैलेंद्र भालेराव, शंखनाद पथकाचे अध्यक्ष नितीन महाजन या वेळी उपस्थित होते.

प्रथम ब्रह्मनाद या नादातून मानवीजीवन आणि परमात्मा यांच्यातील नात्याची आध्यात्मिक जोड दर्शवण्यात आली. त्यानंतर सप्तखंड नाद व अर्धवलय नादांचे सादरीकरण झाले. अर्धवलय नाद पृथ्वीच्या पाताळतील भागाचे प्रतिनिधित्व करतो. तुतारी नाद या चौथ्या आवर्तनातून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. पूर्णवलय, सुदर्शन आवर्तनांनंतर मुक्तछंदनाद आवर्तन मुक्त नादाच्या रूपात सादर झाले. सातही नादांच्या माध्यमातून पृथ्वीवरील सात खंड, पाताळातील अर्धा भाग आणि आध्यात्मिक एकात्मतेचे दर्शन उपस्थितांना झाले.

नितीन महाजन म्हणाले, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचे ७५० वे जयंती वर्ष, जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठगमनाचे ३७५ वर्ष, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे ३५१ वे वर्ष, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे तीनशेवे जयंती वर्ष, महात्मा जोतिबा फुले यांचे १३५ वे पुण्यतिथी वर्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दीपूर्ती सोहळा यानिमित्ताने शंखनाद विश्वविक्रम सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी वर्षभरापासून तयारी सुरू होती. पुण्यासह राज्यभरातून शंखवादक सहभागी झाले होते.

# रात्रभर मुसळधार पावसाने लातूर जलमय

■ महासागर प्रतिनिधी
लातूर, दि. ५ :

लातूर जिल्ह्यात गेल्या पाच दिवसांपासून थांबलेला पाऊस शनिवारी रात्रीपासून पुन्हा जोरदार परतला असून, संपूर्ण जिल्हा मुसळधार पावसाच्या विळख्यात सापडला आहे. रात्रभर झालेल्या मेघगर्जनांसह मुसळधार सरींमुळे शहरासह ग्रामीण भागातील अनेक रस्ते, पूल आणि शेतं पाण्याखाली गेली आहेत. अचानक झालेल्या या पावसामुळे नागरिकांना घराबाहेर पडणे अवघड झाले असून, वाहतुकीची स्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. निलंगा, औसा, रेणापूर, लातूर ग्रामीण भागांत मुसळधार पावसाने थैमान घातलं आहे.

निलंगा तालुक्यातील उस्तुरी, टाकळी आणि बडूर मार्गावरील पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. दैनंदिन प्रवास करणाऱ्या



वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सांगवी, जेवरी, अंबुलगा बुद्रुक परिसरात मुसळधार पावसाची नोंद झाली असून, काही ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्याच्या तक्रारी आल्या आहेत. लातूर ग्रामीणमधील मुरुड व आसपासच्या भागात सकाळपर्यंत जोरदार सरी कायम होत्या. काही भागांमध्ये रस्त्यांवर गुडघ्याएवढं पाणी साचल्याने नागरिकांनी सुरक्षिततेसाठी घरातच थांबण्याचं पसंत केलं.

रात्रभर सुरू असलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील वातावरण चिंताजनक बनले असून, प्रशासनाने पुढील काही तासांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. प्रशासनाने नागरिकांना घराबाहेर न पडण्याचे आणि अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे. तसेच, नदी-नाले ओलांडताना काळजी घेण्याचे आणि पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांवरून वाहन न चालवण्याची सूचना देण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीसाठी आपत्ती व्यवस्थापन पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत.

पाच दिवसांच्या उन्हामुळे शेतकऱ्यांनी शेतीकामांना वेग दिला होता. अनेकांनी सोयाबीन, उडीद आणि मूग काढणीला सुरुवात केली होती. मात्र, अचानक झालेल्या पावसामुळे पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. शेतात पाणी साचल्याने काढलेलं धान्य भिजून गेलं, तर काही ठिकाणी पिकं पूर्णपणे आडवी झाली आहेत. कष्टानं उभं केलेलं पीक डोळ्यासमोर नष्ट होताना पाहणं म्हणजे दुःखद स्वप्न आहे.

# रास गरबा स्पर्धेत सर्वच स्पर्धकांना बक्षिसे

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ५ :

नवरात्री महोत्सवाच्या पर्वावर आपले सामाजिक, सांस्कृतिक, तसेच धार्मिक कर्तव्य बजावून समाजातील महिला व मुलींचा सन्मान व्हावा. त्यांच्या प्रतिभांना चालना मिळावी.

या उद्दात हेतूने जाणता राजा प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा व अन्यायाच्या विरोधात समाजाच्या पाठीशी उभे राहून, आपले सामाजिक कार्य निक्षुन पने करणारे ,सामाजिक कार्यकर्ते पिंटू उर्फ मिलिंद देशमुख यांच्या संकल्पनेतून जान्हवी मिलिंद देशमुख यांच्या पुढाकाराने स्थानिक शारदा चौक येथे कृष्ण रास गरबा, तर्फे गरबा कॉम्पिटिशनचे महिला व मुलींकरिता आयोजन करण्यात आले होते.



रास गरबा कॉम्पिटिशन साठी महिला व मुलींना पूजा उके यांनी पंधरा दिवस प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित केले होते. या गरबा स्पर्धेत ४०महिला व २० मुलींनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना बक्षीसे देऊन सन्मानित करण्यात आले.

नवरात्री परवाच्या पहिल्या दिवसापासून गरब्याचे सादरीकरण करण्यात आले. उत्तम सजावट व डीजे च्या तालावर स्पर्धकांनी गरब्याचे उत्तम सादरीकरण केले. या रास गरब्याचा प्रेक्षकांनी मनमुराद आनंद लुटला. स्पर्धेच्या आयोजनासाठी कविता काळे, अनिता हरजाल, लता कोतेवार, रूपाली भेंडे व श्रुती देशमुख यांनी अथक परिश्रम घेतले.

राग गरबा स्पर्धेतील सर्व स्पर्धकांना ड्रीम आशिया रिसॉर्ट येथे पिंटू देशमुख व जान्हवी देशमुख हे स्वखर्चाने ट्रीपचे आयोजन करणार आहेत.

# भटक्या कुत्र्याच्या छातीतून ३.५ किलो वजनाचा गाठ यशस्वीरीत्या काढण्यात आली

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :

भांडेवाडी पशु निवार केंद्र येथील उजव्या बाजूच्या छातीच्या खालच्या भागावर प्रचंड गाठ असलेल्या भटक्या कुत्र्यावर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. सुमारे ३.५ किलो वजनाची गाठ डॉ. सनी मगर व त्यांच्या वैद्यकीय पथकाने शस्त्रक्रियेद्वारे काढली. हा कुत्रा धारंपेठ झोनच्या कुत्रा पकड पथकाने पकडून शेल्टरमध्ये आणला होता.

शस्त्रक्रिया अत्यंत कौशल्याने पार पाडण्यात आली असून सध्या त्या कुत्र्याची शेल्टरमध्ये शस्त्रक्रियेनंतर काळजीपूर्वक देखरेख केली जात आहे. वैद्यकीय कर्मचारी यांनी सांगितले की कुत्रा उपचारांना चांगला प्रतिसाद देत असून लवकरच पूर्ण बरा होण्याच्या मार्गावर आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ



अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त श्री राजेश भगत व मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ गजेंद्र महल्ले यांच्या देखरेखीत भांडेवाडी येथील पशु निवारा केंद्रात भटक्या श्वानांवर उपचार केले जात आहे. याठिकाणी तज्ञ डॉक्टरांचे चमू कार्यरत आहे.

दर महिन्याला भांडेवाडी पशुनिवार केंद्र मध्ये मोठ्या प्रमाणावर भटके कुत्रे आणले जातात, त्यापैकी अनेक अत्यंत गंभीर अवस्थेत असतात. यामध्ये वाहन अपघातात जखमी होऊन अनेक हाडे मोडलेले कुत्रे, तसेच व्हेनरल ग्रॅन्युलोमा, लकवा, अशक्तपणा आणि वार्धक्याशी संबंधित गुंतागुंतीने त्रस्त झालेले कुत्रे यांचा समावेश होतो. हे शेल्टर अशा प्राण्यांना सुरक्षित आश्रय देण्याबरोबरच वेळेवर पशुवैद्यकीय उपचार व पुनर्वसन करण्याचे कार्य करते.

पावसाळ्यात आणि पावसाळ्यानंतर लगेचच मोठ्या प्रमाणावर भटक्या कुत्र्यांना अळ्यांनी भरलेल्या जखमा (मॅगॉट इन्फेस्टेड वुंड्स) होतात आणि अशा अवस्थेत ते भांडेवाडी शेल्टरमध्ये आणले जातात. या जखमा खोल, मोठ्या आणि गंभीर स्वरूपाच्या असतात.

माशांच्या अळ्यांमुळे झालेल्या या जखमांमुळे तीव्र वेदना, ऊतकांचे नुकसान आणि वेळेवर उपचार न केल्यास जीवघेणी संसर्गजन्य स्थिती (सेप्सिस) निर्माण होऊ शकते.

# लक्ष्मीनारायण मंदिरात ६ व ७ ला शरद पौर्णिमा महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ५ :

रामटेक येथील अंबाळा खाक चौक, राघव कुंड गुहा परिसर येथे गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने शरद पौर्णिमेनिमित्त दोन दिवसीय लक्ष्मीनारायण महापूजा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ब्रह्मलिन योगीराज सीतारामदास महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेने पार पडणार आहे.



दि.६ ऑक्टोबर रोजी ध्वजारोहण, सामूहिक ध्यान,आरती,प्रभातफेरी तसेच ज्ञानेश्वर रक्षक आणि पांडुरंग शेंडे महाराज यांचे प्रवचन होणार आहे. चंद्रभान बीहुने महाराजांचे कीर्तन आणि वर्षा मासुरकर स्वामीजींच्या जीवनावर भाष्य होईल. सुशिल वनवे यांचे गोपालकाला कीर्तन व दुपारी दहीहंडी कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल.

दि.७ ऑक्टोबर रोजी गोपाल यशवंतराव निर्वाण परिवाराच्या वतीने लक्ष्मीनारायण महापूजेची सुरुवात होईल.यानंतर स्वामीजींचा अभिषेक, हवन आणि सामूहिक सुंदरकांड पठण होईल. माणिकभाऊ बेलूरकर स्वामीजींच्या जीवनावर भाष्य करतील. संध्याकाळी रामटेक मंडळाचे भजन, तसेच लक्ष्मणदास काळे महाराज, विपुल छाबरा आणि पराग जीवराजानी यांचे कीर्तन व प्रवचन होईल. शेवटी महालक्ष्मीचा भोग अर्पण करण्यात येईल.या धार्मिक उत्सवात नागपूर, भंडारा आणि आसपासच्या अनेक भक्तांचा सहभाग अपेक्षित असून आयोजकांनी सर्व भक्तांना वेळेवर उपस्थित राहून धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## १२ ला रविवारी सायकल रॅलीचे आयोजन




**नागपूर:** राइड फॉर चॅरिटी ङ्क द सायकलिस्टस नागपूरच्या ५ व्या, वर्धापनदिनानिमित्त आयोजित भव्य सायकल रॅली रविवार १२ ऑक्टोबर २०२५ रोजी, सकाळी ७ वाजता. आयोजित करण्यात आलेली आहेत. स्टार्टिंग पॉइंट केडीके कॉलेज चौक, नंदनवन, नागपुर तसेच या उपक्रमात सायकलपटूंचा सत्कार व सायकल्सच वाटप हे विशेष प्रयोजन साईयोग फाउंडेशन सोबत लोक सहभागातून करण्यात येणार आहे.

तरी सर्व क्रीडा प्रेमींनी या उपक्रमास हातभार लावून जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# व्यावसायिकाला १८.३८ कोटींचा चुना

## २ हजार टन डाळ विकण्याच्या बहाण्याने घेतली रक्कम

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ५ :** सिंगापूरच्या एका कंपनीने २ हजार टन उडद डाळ देण्याची बतावणी करून शहराच्या व्यावसायिकाची १८ कोटी ३८ लाख रुपयांनी फसवणूक केली. हे प्रकरण इमामवाडा पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आले आहे. पोलिसांनी अंकित उज्ज्वलकुमार पगारिया (३१) रा. बाराद्वारी, कापसीच्या तक्रारीवरून ४ आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. विवेक दिनोदिया, संगीता दिनोदिया, नरेश दिनोदिया आणि अनिल व्यास अशी आरोपींची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनोदिया कुटुंबाची म्यानमार आणि सिंगापुरात पी.एल.ग्लोबर इंपेक्स आणि पीटीआय लिमिटेड नावाने फर्म आहे. फिर्यादी अंकित हे पगारिया ओव्हरसीज प्रा. लि. आणि पगारिया फूड लॅब प्रा. लि. कंपनीचे संचालक आहेत. या दोन्ही कंपन्यांच्या माध्यमातून ते देश-विदेशात धान्यासह इतर वस्तूंची आयात-निर्यात करतात. २०२३ मध्ये दलाल शरद जैन याच्या माध्यमातून त्यांची ओळख आरोपींशी झाली होती.

दिनोदिया कुटुंबाने ते डाळींचे सर्वात मोठे व्यापारी असून त्यांना जितकी डाळ लागेल तितकी उपलब्ध करून देतील असे सांगितले. अंकितने त्यांच्याकडून काळ्या उडद डाळीसोबतच इतर डाळीही खरेदी केल्या. संपूर्ण व्यवहार स्पष्ट होता आणि त्यांना वेळेत मालही मिळाला. यामुळे अंकित यांचा आरोपींवर विश्वास वाढला. त्यांनी २०२४ मध्ये आरोपींसोबत २ हजार टन उडद डाळ खरेदी करण्याचा करार केला. या डाळीची किंमत अमेरिकन डॉलरमध्ये २२ लाख १० हजार रुपये तर, भारतीय चलनात १८.३८ कोटी रुपये होती. अंकित यांनी आरोपींसोबत करार करण्यासोबतच त्यांना मालाचे संपूर्ण पैसे दिले. मात्र आरोपींनी पैसे घेऊनही माल पाठवला नाही. अंकित यांनी आरोपींशी अनेकदा संपर्क करून मालाबाबत विचारणा केली, पण दरवेळी वेगवेगळे बहाणे सांगत होते. एक वर्ष लोटूनही आरोपींनी माल पाठवला नाही. अंकित यांनी आरोपींना पैसे परत मागितले असता आरोपी टाळाटाळ करू लागले. शेवटी कंटाळून त्यांनी पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी फसवणुकीसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# समर्थ हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या वंशिका व हिना यांना सुवर्णपदक

## राज्यस्तरीय शालेय वुशू स्पर्धेसाठी निवड



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ६ :

दि. २९ सप्टेंबर ला सोमवारला वर्धा येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यामाने,सिंचन सभागृह वर्धा येथे पार पडलेल्या विभागीय शालेय वुशू स्पर्धेत समर्थ हायस्कूलची वंशिका रहाटे हिने १७ वर्ष वयोगटातील ६२ किलोग्राम वजन गटांमध्ये तर कनिष्ठ महाविद्यालयाची हिना मसूरके हिने १७ वर्षे वयोगटांमध्ये ५६ किलोग्रॅम वजन गटामधील अंतिम सामने जिंकून सुवर्णपदक पटकावले. दोघींची ही पुढील राज्यस्तरीय शालेय वुशू स्पर्धेसाठी निवड झाली. दोन्ही खेळाडू विद्यार्थिनींनी त्यांचे यशाचे श्रेय क्रीडा प्रशिक्षक अजय खेडगरकर तसेच आई वडील व शिक्षकांना दिले शाळेच्या मुख्याध्यापिका एम.एन.लोखंडे, उप मुख्याध्यापक राजेंद्र गायकवाड, पर्यवेक्षक संजय जाधव पर्यवेक्षिका फंदे,शिक्षक ठाकरे, शामकुवर, चव्हाण यांनी आनंद व्यक्त करून खेळाडू विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

# उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय दंतरोग व उपचार शिबिर संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ५ :

उपजिल्हा रुग्णालय, रामटेक येथे शुक्रवार, दि. ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी भव्य वैद्यकीय दंतरोग व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूकडुण अतिदुर्गम भागातून उपचाराकरिता आलेल्या रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.



शिबिराचे उद्घाटन नागपूर मंडळ आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. शशिकांत शंभरकर आणि नागपूर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.एन.बी.राठोड यांच्या शुभहस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी अनेक मान्यवर तसेच आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते. या शिबिरात रुग्णांची ईसीजी, एक्स-रे, शुगर, बीपी तसेच त्वचारोग तपासण्या करण्यात आल्या. एकूण ६९५ रुग्णांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी १०० रुग्णांवर दंतशस्त्रक्रिया करण्यात आली. याशिवाय २८ रुग्णांना हर्निया व हायड्रोसिल उपचाराकरिता भरती करण्यात आले असून, त्यांची शस्त्रक्रिया दि. ४ व ५ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडणार आहे.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी रामटेक उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. संदेश वाघमारे,रामटेक तालुका आरोग्य अधिकारी डॉ.स्मिता काकडे तसेच रुग्णालयातील सर्व डॉक्टर,अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून मोलाची भूमिका बजावली.

या शिबिरामुळे ग्रामीण व दूरवरच्या भागातील रुग्णांना अत्यावश्यक वैद्यकीय सेवा मिळाल्या असून, जनतेकडून या उपक्रमाचे मनापासून स्वागत करण्यात आले.

# महात्मा गांधी जयंती व धम्मचक्र प्रवर्तन दिवस साजरा



■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ५ :

केडीके कान्व्हेंट टेकाडी येथे राष्ट्रपीता महात्मा गांधी जयंती आणि धम्मचक्र प्रवर्तन दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित संस्थेचे संचालक अविनाश कांबळे यांच्या हस्ते महात्मा गांधी व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले . अविनाश कांबळे यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवन चरित्र्यावर उपस्थितांना , विद्यार्थांना मार्गदर्शन केले . कार्यक्रमात शाळेच्या शिक्षकांनी महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्प अर्पित करुन विनम्र अभिवादन केले . या प्रसंगी मनिषा कांबळे , सुरेखा हिंगे , अपर्णा गजभिये , रिना किशोर , अर्चना कारेमोरे , सह विद्यार्थी उपस्थित होते.

# महिला परिवर्तन पतसंस्थेचे थाटात उद्घाटन समारंभ

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ५ :

महिला परिवर्तन सहकारी पतसंस्था मर्या नागपूर जिल्हाच्या माध्यमातून स्थानिक महिलांना अधिक सुलभ बँकिंग सुविधा, मुदत ठेव योजना, सोने खरेदी योजना, परिवर्तन पेन्शन योजना, लाडकी बहीण योजना, महिला परिवर्तन लखपती आवर्त ठेव योजना, लघु उद्योग, शेतकरी व सामान्य ग्राहक यांचे आर्थिक व्यवहार अधिक सुरक्षित आणि सोप्या पद्धतीने करता येतील.

महिला परिवर्तन सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून स्थानिक महिला वर्गाला सुलभ बँकिंग सेवा, कर्ज सुविधा, बचत योजना आणि लघुउद्योग व शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक सहाय्य यासारख्या सुविधा




उपलब्ध करण्यात येतील अशी माहिती संस्थेचे व्यवस्थापक चंद्रशेखर जिचकार यांनी दिली

कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ विजय धोटे उपाध्यक्ष अरविंद सहकारी बँक. यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष राजाराव पी आर. ( सि.ई.ओ) अरविंद सहकारी बँक. प्रमुख पाहुणे रेखा जांगळे, सहकार अधिकारी, समाजसेविका युगा भोसे, पतसंस्थेचे अध्यक्ष नितु जिचकार, उपाध्यक्ष उषा मांडवगडे, सचिव शितल टेकाडे, वनिता मोहोड, रजनी तरटे, शुभांगी आगे, अर्चना ठाकरे, कांचन जिचकार, शालिनी तवले, अंकिता गायकवाड, वृषाली धोटे, तसेच सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

# कृषी महाविद्यालयाच्या वसतिगृहात विद्यार्थ्याचा गळफास

## प्रेम प्रकरणातून घडली घटना, विवाहित होता मृतक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :



बजाजनगर परिसरातील कृषी महाविद्यालयाच्या वसतिगृहात एका विद्यार्थ्याने गळफास लावून आत्महत्या केली. या घटनेने वसतिगृह प्रशासनात एकच खळबळ उडाली. ईश्वरलाल चौधरी रा. बाडमेर, राजस्थान असे मृताचे नाव आहे. प्रेम प्रकरणातून ही घटना घडल्याची चर्चा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ईश्वरलाल बीएस्ससी अॅग्रीकल्चरचा शेवटच्या वर्षाचा विद्यार्थी होता. तो महाविद्यालयाच्या बॉईज हॉस्टेलमध्ये खोली क्र. ११ मध्ये राहात होता.

त्याने खोलीत कोणी नसताना छताच्या पंख्याला दोरी बांधून गळफास लावला.

दरम्यान सहकारी परतले असता दार आतून बंद होते. वारंवार ठोठावूनही त्याने दार न उघडल्याने त्यांना संशय आला. त्यांनी खिडकीतून आत डोकावले असता तो गळफास लावलेल्या अवस्थेत दिसला. तत्काळ घटनेची माहिती वसतिगृह प्रशासन आणि पोलिसांना देण्यात आली. बजाजनगर पोलिस घटनास्थळी पोहोचले. दार तोडून आत प्रवेश करीत मृतदेह ताब्यात घेतला. तपासा दरम्यान पोलिसांना खोलीत एक सुसाईड नोट मिळाले. यातून त्याचे एका तरुणीशी प्रेमसंबंध असल्याचा खुलासा झाला.

ती तरुणी त्याच्यावर लग्नासाठी दबाव टाकत होती. यामुळे तो तणावात होता. ईश्वरलालचे लग्न झाले होते आणि त्याला दीड वर्षाचा एक मुलगाही आहे. त्याने विवाहित असल्याची बाब त्या तरुणीपासून लपवली होती.

याच तणावातून त्याने आत्महत्या केली. सध्या पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

## ८ ला आरोग्य रोगनिदान शिबीराचे आयोजन

**कन्हान :** कन्हान शहर विकास मंच आणि सह्याद्री संस्था नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने धम्मचक्र प्रवर्तन दिवस , राष्ट्रपिता महात्मा गांधी , माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या जयंती निमित्त खदान नंबर सहा येथे शिवमंदिर जवळ बुधवार ऑक्टोंबर रोजी सकाळी ९:३० ते दुपारी ३ वाजता पर्यंत भव्य मोफत आरोग्य रोगनिदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे . शिबीरात इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालय नागपुर , माधवबाग हॉस्पीटल , एबीओ आई इंस्टीट्यूट , लता मंगेशकर हॉस्पीटल येथील डॉक्टर आणि चंमुच्या सहकार्याने नागरिकांच्या जनरल चेकअप , ईसीजी , एक्स-रे, बीपी , शुगर , दातांचे चेकअप , डोळे चेकअप , एच.आय.व्ही , एस.टी.आय आणि टी.बी चेकअप ची तपासणी करण्यात येणार आहे . या नि:शुल्क शिबीराचा नागरिकांनी जास्तीस्त जास्त संख्येत लाभ घ्यावा असे आव्हाहन आयोजकांनी केले आहे. शिबीराच्या यशस्वीतेकरिता कन्हान शहर विकास मंच संस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर , मार्गदर्शक भरत सावळे , नारायण प्रदीप बावन आदि आहे .

# वन्यजीव सप्ताहानिमित्त पक्षी निरीक्षण कार्यक्रम




■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ५ :

वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने नागपूर जिल्हा उपवनसंरक्षक डॉ. विनीता व्यास, सहाय्यक वनसंरक्षक यश काळे,, यांचे मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र, हिंगणा अंतर्गत जैवविविधता उद्यान, अंबाझरी येथे पक्षी निरीक्षणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश वन्यजीवांविषयी आपुलकी निर्माण करणे, जनजागृती घडवून आणणे तसेच त्यांचे संरक्षण व संवर्धन याबाबत जागरूकता वाढवणे हा होता. या कार्यक्रमात मानद वन्यजीव रक्षक व औीलळरींश उेींवळपरींी, थथऋ-खछऊखअचे अजिंक्य भटकर व संजय नाफडे (उखइअ) यांनी विद्यार्थ्यांना पक्ष्यांची ओळख, त्यांचे पर्यावरणातील महत्त्व आणि त्यांच्या संरक्षणाविषयी मार्गदर्शन केले. मानद वन्यजीव रक्षक उधमसिंग यादव यांनी जंगलभ्रमंतीदरम्यान घ्यावयाची काळजी सांगितली. उपवनसंरक्षक (कार्य आयोजना) गीता नन्नावरे यांनी विद्यार्थ्यांना प्लास्टिकचे दुष्परिणाम व त्याचा वापर कसा टाळावा याबाबत माहिती दिली, तर हिंगणा वनपरिक्षेत्र अधिकारी शितल कर्णासे यांनी विविध वृक्षांची ओळख करून दिली.यावेळी सोमलवार , हायस्कूलचे एनसीसी शिक्षक . विजय नाईक यांच्यासह ८ व ९ वीतील एनसीसी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुनील फुलझेले, अनिरुद्ध खडसे (वनपाल), हनुमंत शिंदे, समीर नेवारे, वैशाली लिल्हारे, पूजा बावनथाडे व वनकर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मंगलधामच्या माऊलीच्या उत्सवाची सांगता

**वाडी, ५:** दत्तवाडीतील मंगलधाम सोसायटीमधील मंगलधामच्या माऊलीच्या नवरात्र उत्सवाची सांगता विविध कार्यक्रमांनी करण्यात आली. घटस्थापनेपासून ते देवी विसर्जनापर्यंत.. मंडळाकडून सुगम संगीत, जस गायन, देवीचा गोंधळ महिलांचे व लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, मॅजिक शो.. तसेच लहान मुलांचे व पुरुषांचें मनोरंजनात्मक क्रीडा स्पर्धा घेण्यात आली. नवरात्री उत्सवात कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व मंडळ सक्रिय होते. लहान मुलांना व महिला मंडळींना प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात आले.निखिल डोणारकर यांनी रावणाची सुंदर अशी प्रतिकृती तयार केली होती. परिसरातील उमेश गोमासे,ठाकरे परिवार, ढवले परिवार यांनी राम,लक्ष्मण, सीता, व हनुमानाच्या वेशभूषेत चिमुकल्या बालकांना तयार केले होते. मंगलधाम दुर्गा उत्सव मंडळाचे अध्यक्ष वसंतराव गोरडे यांनी सर्वांचे आभार मानले.



# सीसीआरटी हैदराबाद तेलंगणा प्रशिक्षणाकरिता वसुंधरा धोटे यांची निवड



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ५ :

सांस्कृतिक साधनसंपत्ती आणि प्रशिक्षण केंद्र हैदराबाद तेलंगणा येथे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गावसूत येथील पदविधर शिक्षिका वसुंधरा गजानन धोटे यांची नागपूर जिल्ह्यातून एकमेव निवड करण्यात आलेली आहे. सीसीआर हैदराबाद ट्रेनिंग सेंटर सांस्कृतिक संसाधने आणि प्रशिक्षण केंद्र आहे. हे भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाअंतर्गत एक स्वायत्त संस्था आहे, जी संस्कृती आणि शिक्षणाला जोडण्याचे काम करते.

सदर सेंटर करिता महाराष्ट्र राज्यातील फक्त दहा लोकांची निवड करण्यात आलेली आहे. या प्रशिक्षणाचा निश्चितच आपल्या विद्यार्थ्यांना लाभ होईल. सीसीआरटीचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. त्याखाली एकूण तीन क्षेत्रीय केंद्रे आहेत ङ्ग पश्चिम भारतासाठी उदयपूर, पूर्वोत्तर भारतासाठी गुवाहाटी आणि दक्षिण भारतासाठी हैदराबाद ही भारताच्या सरकारच्या संस्कृती मंत्रालयाखालील एक स्वायत्त संस्था आहे.

शिक्षणप्रणालीमध्ये संस्कृतीचा घटक समाविष्ट करणे, विद्यार्थी, शिक्षक व शैक्षणिक प्रशासन यांच्यात भारतीय कला-संस्कृतीची समज वाढवणे याकरिता ही प्रशिक्षण संस्था निरंतर कार्यरत आहे.

हैदराबाद केंद्र अनेक प्रकारचे कार्यक्रम, प्रशिक्षण व उपक्रम आयोजित करते:

शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक, शैक्षणिक अधिकारी आणि विद्यार्थी यांच्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यशाळा, ओरिएंटेशन कोर्स, सेमिनार तिच्या वार्षिक कार्यक्रम पेटीत येतात.

# भक्तिमार्ग

**आपण आल्हादक शरद अनुभवतो आहोत. आता मेघांची दाटी ओसरली आहे. वेळी-अवेळी दाटून येणारा अंधार, घनघोर बरसणारा पाऊस, त्यामुळे सगळीकडे भरुन राहिलेलं चिंब वातावरण आता विरलं आहे. धरणीची तृष्णापूर्ती करुन वर्षाराणी परतीच्या वाटेला लागली आहे. आता मागे उरली आहे ती संपन्नता आणि या संपन्नतेचा सांगावा सांगणारी हिरवाई... त्यावर बरसणारं शरदाचं चांदणं सृष्टीचं सौंदर्य द्विगुणीत करत आहे.**




प्रत्येक ऋतूमध्ये वेगळं सौंदर्य दडलेलं आहे. सहा ऋतूंचे सोहळे साजरे करण्यासाठी आयुष्य अपुरं पडावं अशीच काहीशी स्थिती असते. कारण ऋतूनुसार बदलणारे निसर्गाचे विभ्रम निरखताना एक जन्मही कमी वाटतो. कधी तप्तता तर कधी घनघोर वर्षा, कधी सर्जनाचा नवोन्मेष तर कधी व्याकूळ करणारी पानगळ, कधी गच्च मेघांचं आवरण तर कधी सर्वदूर पसरणारा फटफटीत प्रकाश, कधी हवेत आल्हाददायक ऊब तर कधी हाडं गोठवून टाकणारी थंडी... निसर्ग नावाचा अवलिया अशा करामती दाखवत राहतो आणि आपण त्याचा आनंद लुटत राहतो. वय पुढे सरकतं, परत परत अनुभवल्यामुळे ऋतूंचा परिचय वाढतो पण अतिपरिचयाने अवज्ञा होण्याचा धोका इथे नसतो. उलट परिचय होईल तितकी प्रतिक्षेची आस वाढते. चिरपरिचित मित्राच्या आगमनाची उत्कंठा जाणवावी तशीच काहीशी जाणीव नव्या ऋतूच्या स्वागतासाठी जाणवते. कारण ऋतूचक्र फिरतं तेव्हाच चौकटीत बद्ध असणाऱ्या जीवनचक्राचे आरे कुरकुरत का होईना, फिरु लागतात. सणावारांच्या रुपाने साजरे होणारे उत्सव झापडबंद आयुष्यात उत्साहाचे नवे रंग भरतात. हे रंग यंत्रयुगात अडकलेल्या माणसाच्या शरीरातील मन नावाच्या संवेदनशील अवयवाला साद घालतात आणि त्यावर उठणारे तरंग वेगळीच सकारात्मकता देऊन जातात. म्हणूनच निसर्गाशी सलगी राखून असणारेच नव्हे तर त्याच्याशी अंतर राखणारेही ऋतूंच्या स्वागतात हरखून जातात.

आताही आपण आल्हादक शरद अनुभवतो आहोत. आता मेघांची दाटी ओसरली आहे. वेळी-अवेळी दाटून येणारा अंधार, घनघोर बरसणारा पाऊस, त्यामुळे सगळीकडे भरुन राहिलेलं चिंब वातावरण आता विरलं आहे. धरणीची तृष्णापूर्ती करुन वर्षाराणी परतीच्या वाटेला लागली आहे. आता मागे उरली आहे ती संपन्नता आणि या संपन्नतेचा सांगावा सांगणारी हिरवाई. शेत-शिवारांमध्ये धान्याच्या राशी बहरु लागल्या आहेत. आगामी सुगीचे संकेत मिळत असल्यामुळे सगळीकडे समाधान दाटलं आहे. हिरवा चारा मिळाल्याने जनावरं पुष्ट झाली आहेत. त्यांच्या हंबरण्यातही पुष्टतेमुळे आलेला जोश स्पष्ट जाणवत आहे. अशा या वातावरणात शरद ऋतू अवतरला आहे. रामचरितमानसमध्ये तुलसीदासांनी या मनभावन ऋतूचं वर्णन केलं आहे. ते लिहितात

बरषा बिगत सरद ऋतू आई।
लछिमन देखहु परम सुहाई।।
फुलें कास सकल महि छाई।
जनु बरषा कृत प्रगट बुढाई।।
ऋतू संहारममध्येदेखील
लो आ गई यह नव वधू-सी शोभती शरद नायिका।

असं लडिवाळ वर्णन केलं आहे. कोणाला या ऋतूतील आल्हाददायक थंडी आवडते तर कोणाला शुभ्र चांदण्यांची भुरळ पडते. कोणी हवेच्या सुगंधी लाटांवर विहरतो तर कोणाला निसर्गाचं बहरलेलं रुप पाहण्याची ओढ असते. काहीजणांना या ऋतूमध्ये साजऱ्या होणाऱ्या दसरा-दिवाळीचे वेध असतात तर काहींना धार्मिक अंगाने हा ऋतू जवळचा वाटतो. प्रत्येकजण याकडे वेगवेगळ्या अर्थाने आणि मानसिकतेने पाहतो आणि पाहणाऱ्या प्रत्येकाला समाधानाचं वरदानच देतो.

शरदात वेगळीच रम्यता, सहजता अनुभवायला मिळते. या दिवसात ना चिखल असतो ना धूळ. त्यामुळेच एक वेगळीच निर्मळता बघायला मिळते. पाण्याच्या लोटांसवे केरकचरा वाहून गेल्यामुळे स्वच्छ झालेला परिसर ही निर्मळता लख्खपणे मिरवतो. आता आकाशही निरभ्र असतं. ते विधवेच्या कपाळासारखं फटफटीतही नाही आणि चिंतेनं ग्रासलेल्या सुरकुत्यामिश्रीत कपाळासारखं काळवंडलेलंही नाही. ते असतं एखाद्या भाग्यवंताच्या सतेज ललाटासारखं... सुखाची पदचिन्हं दाखवणारं, स्वच्छ, विस्तीर्ण... या स्वच्छ प्रांगणात खेळ रंगतो तो चंद्र-चांदण्यांचा... शीतल प्रकाशाचा... अशा रम्यतेत कवींना कल्पनेचे धुमारे फुटतातच, त्याचबरोबर नभाकडे पाहणारा प्रत्येकजण चांदण्यांच्या त्या जाळ्यात अडकून पडतो.

सूर्याची प्रखरता नसणं हे रम्यता वाढण्याचं आणखी एक कारण आहे जे शरदाला वेगळी सौम्यता देऊन जातं. खरं तर ही प्रखरता शिशिरातही नसते पण, त्या वेळची थंडी हाडांपर्यंत पोहोचते. सूर्यप्रकाशाचा अभाव उष्णतेचं साम्राज्य उधळून लावतो. आता मात्र तसं नसतं. सूर्य असतो, तो दिवसा आपलं तेजही दाखवत असतो. त्यामुळे दिवसा हवी ती ऊब जाणवत असते. पण लाही लाही होण्याची सुतराम शक्यता नसते. दुखऱ्या भागावर सहन होईल इतका शेक घेतल्यावर जाणवते तशीच संतुष्टी या उन्हाने मिळत असते. वर्षाऋतूतील झडीने आलेलं मळभ दूर करण्यासाठी प्रकाशाचं हे वरदान आवश्यक असतंच पण त्याच वेळी शरदातील रात्री मात्र शीतल असतात. ना थडथडणारी थंडी ना घामाघूम करणारी धुमस... अशा या रम्य रात्रींना चांदण्याची सोबत असते ती वेगळीच. म्हणूनच या दिवसातील प्रत्येक रात्रच जणू पौर्णिमेची रात्र होऊन जाते. चंद्राची कला कशीही असो, परिणाम धवलच राहतो हे विशेष आणि पौर्णिमेचा नखरा तर काय वर्णावा! प्रसूतीनंतर एखाद्या अवघडलेल्या स्त्रीच्या सर्वांगावर तेज चढावं, सगळं शैथिल्य, मरगळ, थकवा झटकून ती नव्या तेजानं झळाळून उठावी अगदी तसंच दिसतं आकाश यावेळी... म्हणूनच शारदातील पौर्णिमा अन्य पौर्णिमांच्या तुलनेनं अधिक तेजस्वी भासते. आश्विन मासातील पौर्णिमेला चंद्र ९९.९९ टक्के प्रकाशमान असतो. तो पृथ्वीच्या सर्वाधिक जवळ असतो. त्यामुळेही असेल कदाचित, पण ही शारद पौर्णिमा अधिक प्रकाशमान होते. शशी अनोख्या तेजानं झळाळून उठतो. लुकलुकणारी हजारो रत्नं या अनुपम तेजाला स्वतेज अर्पित करतात. हा नजारा अनुभवण्यासाठी, शरदाचं आल्हाददायक चांदणं अंगावर घेण्यासाठी, नभाच्या अथांग छताखाली मुक्त श्वास घेण्यासाठी आणि पर्जन्यकाळानंतरचा संपन्न सुगंध अनुभवण्यासाठीच कदाचित कोजागिरी पौर्णिमा साजरी होत असावी.

भक्ती लेख

शरदात साजऱ्या होणाऱ्या कोजागिरीला वेगळंच महत्त्व आहे. एका अर्थी ही प्रकाशपर्वाची नांदी ठरते. कोजागिरी साजरी करण्याबाबत बऱ्याच आख्यायिका ऐकायला मिळतात. या रात्री लक्ष्मी प्रत्येक घरासमोर जाते आणि ङ्गको जागर्ति?ङ्ख असं विचारते. जाग असणाऱ्या घराला तिचे आशिष लाभतात, अशी एक श्रद्धा आहे. म्हणूनच कोजागिरीच्या रात्री पूर्ण चंद्रबिंबाला आटीव दुधाचा नैवेद्य दाखवतात. या दुधात चंद्राचं प्रतिबिंब पाहतात. केशर, वेलदोडा, सुका मेवा घालून सिद्ध केलेलं अमृतासमान मधूर चवीचं हे दूध सग्यासोयऱ्यांसवे हसत-खेळत प्राशन केलं जातं. चांदणंरहित अवस्थेत अंधाराच्या पहाऱ्यात झाडांचे वैविध्यपूर्ण आकारही भेसूर भासू शकतात. गडद अंधाराच्या प्रभावाने रातकिड्यांच्या चिरंतन किरकिरीलाही अंगात भीतीची लहर उठवणारी लय मिळते. तो स्तब्ध कोलाहल आनंद देत नाही. पण अशा रात्रीवर चांदण्यांचा दुधाळ प्रकाश पसरताच प्रत्येकावर चांदीचं तेज लगडू लागतं. लख्ख नाही की अंधुकही नाही, स्पष्टही नाही आणि अस्पष्टही नाही, लखलखाटही नाही की मिणमिणता प्रकाश नाही... या अवस्थेत निसर्गातला प्रत्येक घटक आहे त्यापेक्षा कैकपटीनं सौंदर्यपूर्ण दिसू लागतो. नेहमीचेच ते वृक्ष, लता-वेली पण चांदणकिरणांच्या संपर्कात येताच वेगळे भासू लागतात. जवळ झोपलेल्या तान्हुल्याच्या अंगावरील पांघरुण सारखं करून कूस पालटताना यावा तितका हलकासा आवाज येतो जेव्हा पाखरं रात्री फडफड करतात. पण चांदण्या रात्री ही हलकीशी सळसळ भीती नव्हे तर आगळा नाद देऊन जाते. आकाशात उडणारा एखादा भरकटलेला चुकार पक्षी आपल्याला घाबरवत नाही. कारण तोही आपल्यासारखाच चांदण्यात विहरण्यास आतूर असतो. हे असतं शरदाचं सामर्थ्य. हे असतं शरदाचं सौंदर्य...

## सद्गुरूंच्या चरणी...

दासबोधात समर्थांनी पादसेवनभक्तीनिरूपण केलं आहे. त्यांनी सद्गुरूंच्या पादुकांच्या भक्तीचं महात्म्य वर्णन केलं आहे. समर्थ म्हणतात, पादसेवन तेचि जाणावे। काया वाचा मनोभावे। सद्गुरूचे पाय सेवावे। सद्गतीकारणे।। या नाव पादसेवन। सद्गुरूपदी अनन्यपण। निरसावया जन्ममरण। यातायाती।। सद्गुरूकृपेविण काहीं भवतरणोपाव तों नाहीं। याकारणे लवलाही सद्गुरूपाय सेवावे।।

सद्गुरूंच्या पावलांची म्हणजे त्यांच्या पादुकांची मनोभावे सेवा करावी. सद्गुरूच्या पाउली काया, वाचा आणि मन अर्पण करावे. सद्गती म्हणजेच मोक्ष मिळण्यासाठी सद्गुरूच्या पादुकांची सेवा करायला हवी. जन्ममरणाच्या कचाट्यातून कायमचं सुटण्यासाठी, जन्मांच्या येरझाऱ्या थांबवण्यासाठी सद्गुरूच्या चरणी अनन्यभावाने शरण जाण्याला पादसेवन असं म्हणतात. सद्गुरूच्या कृपेविण तरणोपाय नाही, हे आपण सर्वांनी जाणून घ्यायला हवं. त्यामुळे शक्य तितक्या लवकर सद्गुरूच्या चरणांची सेवा करायला सुरूवात करावी.



सद्वस्तु दाखवी सद्गुरू। सकळ सारासारविचारू। परब्रह्माचा निर्धारू। अंतरी बाणे।।५।। जे वस्तु दृष्टीस दिसेना। आणी मनास तेही भासेना। संगत्यागेविण येना। अनुभवासी।।६।। अनुभव घेता संगत्याग नसे। संगत्यागे अनुभव न दिसे। हे अनुभवी यासीच भासे। येरां गथागोवी।।७।।

श्री सद्गुरूंच्या सान्निध्यात परब्रह्माचं दर्शन घडतं. सारासार विचार म्हणजे काय हे कळतं.

दासबोधातून...

परब्रह्माच्या स्वरुपासंबंधी निश्चय अंत:करणात ठसतो. जी वस्तू डोळ्याने दिसत नाही आणि मनानेही अनुभवता येत नाही ती आत्मवस्तू संगाचा त्याग केल्याशिवाय अनुभवास येत नाही. मी अनुभव घेतो, अशी वृत्ती असेपर्यंत संगत्याग नसतो. संगत्याग घडतो त्यावेळी अनुभव लक्षात येत नाही. द्वैत रहातच नाही. अद्वैत साधतं. माझं हे बोलणं फक्त स्वानुभवानेच समजू शकतं. हा अनुभव घेतला नाही तर सगळा गोंधळ असं एखाद्याला वाटू शकतं.

## प्रेमवर्धक करवां चौथ

पती आणि पत्नी यांचं नातं अनखं मानलं जातं. या नात्यामधलं माधुर्य, प्रेम, आपुलकी टिकून रहावी यासाठी काही सण साजरे करण्याची परंपरा भारतीय संस्कृतीत आहे. महाराष्ट्रात वटसावित्रीला वडाची पूजा करून पतीच्या दीर्घायुष्याची कामना केली जाते. प्रत्येक प्रांतागणिक प्रथा, परंपरा बदलत असल्या तरी सणांमागची भावना एकच असते. पती-पत्नीच्या नात्याचं प्रतीक असणारा असाच एक सण म्हणजे करवां चौथ. उत्तरेकडील राज्यांमध्ये हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. करवा चौथला विवाहित महिला दिवसभर उपवास करतात. या दिवशी पाणीही वर्ज्य मानलं जातं. चंद्रदर्शन झाल्यानंतरच महिला करवां चौथचा उपवास सोडतात.

कोजागिरी पौर्णिमेनंतर येणारी चतुर्थी म्हणजे करवां चौथ. चौथ म्हणजे चतुर्थी तर करवां म्हणजे मातीचं छोटं भांड. करवां चौथच्या निमित्ताने मातीच्या भांड्यांमध्ये गहू भरून हे वाण सवाष्ण महिलांना दिलं जातं. करवां चौथ हा पती-पत्नींना प्रेमळ ऋणानुबंधात जोडणारा सण असला तरी प्राचीन काळात निराळ्या उद्देशाने ही परंपरा सुरू झाली होती. पूर्वीच्या काळी लहान वयातच मुलींची लग्न



होत असत. लग्नानंतर सासरी आलेल्या मुलींना मनमोकळेपणाने वागता येत नसे. मन मोकळं करण्यासाठी सोबत कोणी नसल्याने त्यांची घुसमट होत असे. त्यामुळे लग्नाच्या वेळी छोटा समारंभ आयोजित करून एक महिला वधूची बहीण बनत असे. हे नातं आयुष्यभरासाठी जोडलं जात असे. मैत्रीचं, आपुलकीचं आणि भगिनीभाव वृद्धिंगत करणारं असं हे नातं टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने करवां चौथची परंपरा सुरू झाली असंही काहीजण मानतात. पण कालानुरूप त्यात बदल घडला आणि पतीच्या दीर्घायुष्यासाठी उपवास करण्याची परंपरा सुरू झाली.

भक्तीमार्ग

करवां चौथशी संबंधित बऱ्याच आख्यायिका आहेत. या सणाच्या निमित्ताने महिला एकत्र येवून चौथ मातेचं पूजन करतात. करवां चौथची कथा सांगितली जाते. दिवसभर उपवास केला जातो. रात्री चंद्रदर्शन आणि पूजन झाल्यानंतर पाण्याचा घोट घेऊन आणि पंचपक्वान्नांचं सेवन करून महिला उपवास सोडतात. हा सण उत्तरेकडच्या राज्यांमधला असला तरी अन्य राज्यांमध्ये काही फरकाने साजरा होतो.

## सद्वर्तनाची फळे गोमटी

सतत हसत रहा, प्रत्येकाचा मान राखा असं सांगितलं जातं. हसत राहणारा माणूस सदैव आनंदी असतो. सर्वांशी मिळून-मिसळून राहिल्याने आपल्याला बरेच फायदे मिळतात. एका कथेद्वारे हे जाणून घेऊ या...




बर्फ बनवण्याच्या कारखान्यात काम करणारा एक कामगार तेथील रखवालदाराशी कायम हसून बोलत असे. जाता येता त्याची चौकशी करत असे. एकदा कारखाना बंद होण्यापूर्वी बर्फ ठेवण्याच्या निमित्ताने तो एकटाच त्या खोलीत गेला. दुर्दैवाने अचानक खोलीचा दरवाजा बंद झाला. हा माणूस बर्फात अडकला. काही वेळानंतर शरीर थंड पडणार आणि आपला मृत्यू होणार ते त्याने ताडलं. आता काय करावं, असा विचार करत असतानाच दुसरीकडे तो देवाचा धावा करू लागला. मृत्यू समोर दिसत होता. तितक्यात बाहेरून आवाज ऐकू आला. दरवाजा उघडून रखवालदार त्याच्याकडे धावत येत होता. रखवालदाराने त्याला सोडवलं आणि उचलून हिटरजवळ ठेवलं. त्या उबेने खूप बरं वाटलं.

कामगाराने रखवालदाराला विचारलं, तुम्हाला माझ्याबद्दल कसं कळलं? त्यावर रखवालदार म्हणाला, आपल्या कारखान्यात अनेक कामगार काम करतात. पण माझी विचारपूस खूप कमी लोक करतात. तुम्ही नेहमी काका, कसं काय बरं आहे ना, असं विचारता. जाताना सांगून जाता. आज येताना तुम्ही माझी चौकशी केली. पण जाताना दिसला नाहीत. म्हणून मग मीच बघायला आलो आणि तुम्ही या बर्फाच्या खोलीत अडकून पडल्याचं दिसलं. अशाप्रकारे रखवालदाराची विचारपूस केल्याने, त्याच्याशी प्रेमाने वागल्याने त्या कामगाराचा जीव वाचला होता. कोण कधी कामी येईल याचा नेम नसतो. त्यामुळे प्रत्येकाशी हसून खेळून वागायला हवं.

आत्मबोध

## लाभदायी मंत्र

इच्छापूर्तीसाठी हिंदू धर्मात अनेक मंत्र सांगितले आहेत. या मंत्रांच्या पठणाने भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात. विशिष्ट इच्छापूर्तीसाठीही काही मंत्र आहेत. पण संस्कृतमधल्या या मंत्रांचा उच्चार कठीण असतो. त्यांचा अर्थही पटकन लक्षात येत नाही. पण रामचरितमानस या ग्रंथातल्या सोप्या मंत्रांच्या उच्चाराने भक्तांच्या मनोकामना पूर्ण होऊ शकतात. या मंत्रांविषयी...




* कवन सो काज कठिन जग माही। जो नहीं होइ तात तुम पाही।। मनोकामनापूर्ती आणि सर्व समस्यांच्या सोडवणुकीसाठी या मंत्राचं पठण करावं.

* भय व संशयाच्या निवारणासाठी रामकथा सुंदर कर तारी। संशय बिहग उडव निहारी।। हा मंत्र जपावा.

* मामभिरक्षय रघुकुल नायक। धृतवर चाप रूचिर कर सायक।। अनोळखी ठिकाणी गेल्यावर भयनाशनासाठी हा मंत्र मदतीला येऊ शकतो.

* सुनि प्रभू वचन, हरष हनुमाना। सरनागत बच्छल भगवाना।। भगवान रामाला शरण जाण्यासाठी हा मंत्र जपावा.

* राजीव नयन धरे धनु सायक। भगत बिपति भंजन सुखदायक।। आपत्ती दूर करण्यासाठी हा मंत्र लाभदायी ठरतो.

* दैहिक दैविक, भौतिक तापा। राम राज नक्षह काहुही ब्याप।। रोगनाशासाठी या मंत्राचं पठण करावं.

मंत्रजागर

* गुरू गृह गए पढन रघुराई। अल्पकाल विद्या सब आई।। विद्याप्राप्तीसाठी या मंत्राचं पठण करावं.

* जे सकाम नर सुनहि जो गावहि। सुख संपत्ती नानविधि पावही।। संपत्तीप्राप्तीसाठी हा मंत्र म्हणावा.

* बयरू न कर काहू सन कोई। राम प्रताप विषमता खोई।। शत्रुच्या नाशासाठी हा मंत्र लाभदायी ठरतो.

## देशाविदेशातील पवित्र गुहा

प्राचीन काळात अनेक देशांमध्ये सनातन धर्माचा प्रसार झाला होता. म्हणूनच परदेशातही हिंदू धर्माशी संबंधित खाणाखुणा आढळतात. भारतासह परदेशातही काही गुहा आहेत ज्यामध्ये हिंदू धर्माशी संबंधित प्रतीकं सापडली आहेत. देशाविदेशातल्या अशाच काही गुहांविषयी जाणून घेऊ या...

* मलेशियामध्ये अनेक गुहा आहेत. इथल्या एका गुहेत कार्तिकस्वामी म्हणजेच मुरूगनचं मंदिर आहे. याठिकाणी भगवान मुरूगनच्या जन्मदिनी थैपुसम नावाचा उत्सव साजरा केला जातो. या मंदिरात मुरूगनची ४३ मीटर उंच मूर्ती आहे.

* इंडोनेशियातल्या बाली बेटावर हिंदूंची अनेक मंदिरं आहेत. इथे एक गुहाही आहे. ही गुहा गोवा गजह या नावाने ओळखली जाते. या गुहेत तीन शिवलिंग आहेत. या गुहेचा समावेश युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत करण्यात आला आहे.



* कर्नाटकातल्या बदामीजवळ एक गुहा आहे. बदामी गुहा या नावाने ती ओळखली जाते. या ठिकाणी एकूण चार गुहा आहेत. त्यापैकी एक गुहा भगवान विष्णूशी तर एक गुहा शंकराशी संबंधित आहे. या मुख्य गुहेवर सुंदर नक्षीकाम करण्यात आलं आहे.

* राजस्थानमधल्या अरवली पर्वतरांगांमध्ये परशुराम महादेव गुहा आहे. या ठिकाणी मंदिरही आहे. या मंदिरात स्वयंभू शिवलिंग आहे. भगवान परशुरामाने या गुहेची निर्मिती केली असल्याचं बोललं जातं. या ठिकाणी परशुरामाने कठोर तपश्चर्या केल्याचं मानलं जातं.


तीर्थक्षेत्र

* छत्तीसगडमधल्या सरगुजा जिल्ह्यात सीताबेंग आणि जोगिमारा नावाच्या गुहा आहेत. या गुहांपर्यंत पोहोचण्यासाठी घनदाट जंगलांमधून जावं लागतं.

## कधी करावं स्नान?

हिंदू संस्कृतीत स्नानाचं अनन्यसाधारण महत्त्व आहे. पहाटे उठून अभ्यंग स्नान करणं फलदायी मानलं जातं. भाविक तीर्थस्थानी जातात आणि पवित्र नद्यांमध्ये स्नान करतात. अशाप्रकारे स्नान केल्याने मोक्ष मिळतो, अशी त्यांची श्रद्धा असते. तीर्थस्थानी केलेल्या स्नानालाच महत्त्व असतं असं नाही तर दररोज घरी केलं जाणारं स्नानही तितकंच महत्त्वाचं असतं. शरीराच्या स्वच्छतेसाठी दररोज स्नान करायला हवं. पण स्नान नेमकं केव्हा करावं हे जाणून घेणंही गरजेचं आहे. हिंदू धर्मातल्या धर्मग्रंथांमध्ये स्नानप्रकारांचं वर्णन करण्यात आलं आहे. यात सकाळच्या स्नानाचे चार प्रकार सांगण्यात आले आहेत. मुनी स्नान, देव स्नान, मानव स्नान आणि राक्षस स्नान असे हे चार प्रकार होत.

पहाटे चार ते पाचच्या दरम्यान केलेल्या स्नानाला मुनी स्नान म्हटलं जातं. पहाटे पाच ते सहा या वेळेत केलेलं स्नान म्हणजे देवस्नान. सहा ते आठच्या दरम्यान मानव स्नान आणि त्यानंतर केल्या जाणाऱ्या स्नानाला राक्षस स्नान असं म्हटलं जातं. धर्मग्रंथांनुसार मुनीस्नान सर्वोत्तम मानलं जातं. देवस्नान उत्तम तर मानव स्नान सामान्य मानलं जातं. ग्रंथांमध्ये राक्षस स्नानाचा निषेध करण्यात आला आहे. त्यामुळे सकाळी आठ वाजण्याआधी स्नान करून घ्यायला हवं.



प्रत्येक स्नान फलदायी आहे. मुनी स्नानामुळे घरात संपन्नता, सुख, शांती, समाधान नांदतं. तर देव स्नानामुळे घरात वैभव, यश कीर्ती, सुख, शांती, संतुष्टता येते असं म्हणतात. तर मानव स्नानामुळे कामात यश मिळतं, सत्कर्म करण्याची इच्छा वाढीस लागते. तसंच कुटुंबातलं स्थैर्य आणि ऐक्य टिकून राहतं. तर राक्षसी स्नान करणाऱ्यांना आयुष्यात दु:ख भोगावी लागतात. दारिद्र्य, अपमान यांचा सामना करावा लागतो.

जाणून घ्या

# एसटी कर्मचाऱ्यांचे १३ ऑक्टोबरपासून बेमुदत आंदोलन

## एसटी कामगारांना दिवाळीनिमित्त १५ हजार रुपये भेट द्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

एसटी कामगारांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता, एसटी कामगारांना दिवाळीनिमित्त १५ हजार रुपये भेट, कामगार करारातील तरतुदीनुसार एसटी कामगारांना दिवाळीनिमित्त १२,५०० रुपये सण उचल देण्यात यावी आदी मागण्या महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीने केल्या आहेत. कृती समिती आणि एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष डॉ. माधव कुसेकर यांच्यात ६ ऑक्टोबर रोजी या मागण्यासंदर्भात बैठक होणार आहे. त्या बैठकीत सकारात्मक निर्णय आणि त्याची अंमलबजावणी न झाल्यास १३ ऑक्टोबरपासून बेमुदत आंदोलन करण्यात येणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या प्रलंबित आहेत. तसेच एसटी महामंडळाचे टप्प्याटप्प्याने खासगीकरण करण्यात येत आहे. एसटीच्या जागांचा सार्वजनिक - खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर विकास करण्याचे धोरण आखले आहे. त्याऐवजी महामंडळाने ही जागा स्वतः



विकसित करावी. तसेच नुकतीच घोषित केलेली कंत्राटी भरती बंद करावी आदी मागण्या महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीने केल्या आहेत.

कामगार कराराच्या तरतुदीनुसार एसटी कामगारांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीचा दर लागू करण्याचे मान्य केले आहे. असे असताना घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीच्या दरामध्ये एकतर्फी कपात करून कामगार कराराच्या तरतुदीचा एसटी प्रशासनाने भंग केला आहे.

मुंबई औद्योगिक न्यायालयाने थकबाकी देण्याचा निर्णय देऊनही प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे या मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी ६ ऑक्टोबर रोजी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष डॉ. माधव कुसेकर यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीतील चर्चेनंतर आंदोलनाची रुपरेषा निश्चित करण्यात येणार आहे. प्रलंबित मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास १३ ऑक्टोबरपासून आंदोलन करण्यात येईल. सुरुवातीला मुंबई सेंट्रल येथील एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल. त्यानंतरही प्रशासन जागे झाले नाही, तर राज्यभरात काम बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा कृती समितीने दिला आहे.

एसटी कर्मचारी कुटुंबासोबत सण साजरा करण्याऐवजी प्रवाशांना सेवा देण्यात व्यग्र असतात. मात्र, त्याबदल्यात त्यांना योग्य मोबादला मिळत नाही. आपत्कालीन वेळेत एसटी कर्मचाऱ्यांनी राज्यात एसटीची सेवा सुरू ठेवली होती. त्यामुळे राज्य सरकार आणि एसटी महामंडळाने एसटी कर्मचाऱ्यांची देणी देणे आवश्यक आहे. अन्यथा ऐन दिवाळीच्या तोंडावर आंदोलन करून, राज्यभरात एसटी सेवा बंद केली जाईल, असा इशारा महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीने दिला आहे. या कृती समितीत विविध पक्षांच्या आणि विचारांच्या एसटी कामगार संघटनांचा समावेश आहे.

थकीत महागाई भत्ता, वेतनवाढ फरकाची रक्कम व इतर थकीत देणी अशी मिळून कर्मचाऱ्यांची ४ हजार कोटी रुपयांची थकीत देणी व इतर प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली मशाल मोर्चा काढणार आहेत. एसटीच्या मुंबई सेंट्रल येथील मध्यवर्ती कार्यालयावर १२ ऑक्टोबर २०२५ रोजी मध्यरात्री १२ वाजता मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोचानंतर तात्काळ एसटी कर्मचारी बेमुदत ठिय्या आंदोलन करणार आहेत. एसटीच्या स्थापनेपासून कर्मचाऱ्यांची आंदोलने सुरू आहेत. विविध मागण्यांसाठी ही आंदोलने करण्यात आली.

# अमित शाह महाराष्ट्राचे सुपर मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :



## हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह रविवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून त्यांच्या हस्ते अहिल्यानगरमध्ये डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचा नूतनीकरण सोहळा झाला. तर लोणी इथे त्यांच्याहस्ते सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि लोकनेते, पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या पुणाकृती पुतळ्याचे अनावरण झाले. याशिवाय देशातला पहिला सहकारी कॉम्प्रेस बायो गॅस प्रकल्प आणि स्प्रे ड्रायर पोटॅश ग्रेन्युएल प्रकल्पाचे उद्घाटन देखील झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार शाह यांच्यासोबत आहेत. असे असतानाच काँग्रेसने गृहमंत्री शाह यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी यांनी नुकतीच दीक्षाभूमी ते सेवाग्राम अशी पदयात्रा काढली होती. याच धर्तीवर आता काँग्रेस वर्षभर पदयात्रा काढणार आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान भाजप सत्तेत आल्यास संविधान बदलणार अशा प्रचाराचा काँग्रेसला फायदा झाला होता. भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असून काँग्रेसने पुन्हा एकदा संविधानाचा मुद्दा हातात घेतला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने नुकताच शताब्दी वर्षातील विजयादशमी सोहळा साजरा केला. मात्र, संघ संविधानविरोधी असून समाजात कायम असत्य पसरवत आला आहे. त्यामुळे संघाने स्वतःला विसर्जित करावे किंवा जाहीरपणे संविधानाचा स्वीकार करावा, हा संदेश जनतेला देण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या वतीने राज्यभर पदयात्रा काढली जाणार आहे. संघाच्या पुढच्या वर्धापन दिनापर्यंत ही यात्रा चालणार असल्याची माहिती, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नाममात्र मुख्यमंत्री असून राज्याचा संपूर्ण कारभार हे गृहमंत्री अमित शाह चालवतात. कुठला पक्ष फोडायला, कुणाला पक्षात प्रवेश द्यायचा, राज्यासाठी कुठल्या योजना लागू करायच्या हे सर्व अमित शाह ठरवतात. मुख्यमंत्र्यांना काहीही अधिकार नसल्याने शाह महाराष्ट्राचे सुपर मुख्यमंत्री असल्याचा आरोपही सपकाळ यांनी केला.

# विसर्जन मिरवणुकीवर दगडफेक

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ५ :

बुलढाणा जिल्ह्यात शांततेत पार पडलेल्या दुर्गा व जगदंबा उत्सवाला अखेर काल रात्री गालबोट लागले! बुलढाणा जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर येथे घडलेल्या घटनेने या उत्सवाला गालबोट लागली.

बावनबीर येथील जगदंबा माता विसर्जन मिरवणुकीवर काल शनिवारी, चार ऑक्टोबर रोजी रात्री उशिरा दगडफेक करण्यात आली. अज्ञात समाजकंटकांनी केलेल्या दगडफेकीत काही भाविक जखमी झाले. यावेळी दगडाचा मारा करण्यात आला. यामुळे दोन्ही गट एकमेकांसमोर उभे ठाकले. एकमेकांवर दगडफेक करण्यात आली.

यापरिणामी मिरवणूकीत एकच गोंधळ उडून धावपळ उडाली. मिरवणूक बंदोबस्तावर तैनात पोलीस कर्मचाऱ्यांची तारांबळ उडल्याचे दिसून आले. यामुळे देवी उत्सव मंडळानी विसर्जन मिरवणुका आहे त्या ठिकाणी थांबवण्याचा निर्णय घेतला. जोपर्यंत दगडफेक करणाऱ्या समाजकंटकांना पोलीस अटक करीत नाही तोपर्यंत विसर्जन मिरवणुका सुरु होणार नाही, असा निर्णय मंडळानी घेत मिरवणूक मार्गावर ठिय्या मांडला. हा ठिय्या आज रविवारी उत्तररात्री पर्यंत सुरु राहिला. यामुळे घटनास्थळी व बावणबीर गावात गंभीर तणाव निर्माण झाला. याची माहिती तामगाव पोलीस ठाणे व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आली. घटनास्थळी पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, ठिकठिकाणची अतिरिक्त पोलीस कुमक दाखल झाली.

याची माहिती मिळताच जळगाव जामोदचे आमदार संजय कुटे यांनी गावाला भेट दिली. त्यांनी समजूत घातल्यावर मंडळाचे संतप्त पदाधिकारी भाविक शांत झाले. आमदार व अधिकाऱ्यांनी ठोस कारवाईचे आश्वासन दिल्यावर आज रविवारी, ५ ऑक्टोबरला पहाटे विसर्जन करण्यात आले. आज रविवारी सुद्धा गावात तगडा बंदोबस्त लावण्यात आल्याने गावाला पोलीस छावणीचे स्वरूप आले आहे. गावात तणाव असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे वरिष्ठ पोलीस सूत्रांनी सांगितले.

# अखेर मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला

## टीईटीची भीती असणाऱ्या लाखो शिक्षकांना दिलासा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने राज्यातील लाखो शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण करण्याच्या भीतीचे वातावरण असताना या गंभीर विषयाची दखल घेत, टीईटी संदर्भात भाजप शिक्षक आघाडीचे पूर्व विदर्भ अध्यक्ष अनिल शिवणकर यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याना निवेदन देण्यात आले. यावेळी राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करणार असल्याची ग्वाही, फडणवीस यांनी शिष्टमंडळाला दिली.



सेवेत कायम रहायचे असेल तर शिक्षकांना आता टीईटी म्हणजे शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले. वयाची ५२ वर्षे उलटून गेलेल्या शिक्षकांना यातून वगळण्यात आले आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे शिक्षकांपुढे मोठा पेच निर्माण झालाय. परीक्षा उत्तीर्ण झाले नाही तर शिक्षकांवर नोकरी गमावण्याची वेळ येवू शकते. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात पुनर्विचार याचिका करावी अशी मागणी भाजप शिक्षक आघाडीने केली. शिक्षक होण्यासाठी डीएड किंवा बीएड करून उपयोग नाही, तर टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य केले आहे.

सन २०१३ पासून ही परीक्षा सक्तीची केली आहे. त्यामुळे डीएड, बीएड चांगल्या गुणवत्तेने उत्तीर्ण होऊनही टीईटी उत्तीर्ण नसल्यामुळे अनेकजण बेरोजगार आहे. मात्र, टीईटी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील टेट परीक्षा द्यावी लागत असे, त्या परीक्षेतील गुणवत्तेनुसार शिक्षकांची नियुक्ती करण्यात येत असे. गेल्या काही वर्षात याचप्रकारे राज्यात बारा हजार शिक्षकांची भरती करण्यात आली. परंतु, आता शिक्षकांना सेवेत कायम राहायचे असेल तर व पदोन्नतीचा लाभ घ्यायचा असेल तर टीईटी उत्तीर्ण व्हावे लागणार आहे.

सेवेचा निम्मा काळ संपल्यावर परीक्षा द्यावी लागणार आहे. त्यामुळे याविरोधात भाजप शिक्षक आघाडीने निवेदन दिले. यावेळी शेषराव बिजवार, प्रदीप गौतम, मोहनिष राऊत, योगेश धाडसे, नीळकंठ मेहर, सुनील गायकवाड, प्रभाकर उइके आदींची उपस्थिती होती.

# आज ठरणार नगराध्यक्ष पदांच्या आरक्षणाचा नवा अध्याय

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. ५ :

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रंगत वाढणार आहे. येत्या सोमवारी, ६ ऑक्टोबर रोजी मंत्रालयात नगरपरिषद व नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. नगर विकास विभागाच्या उपसचिव प्रियांका कुलकर्णी-छापवाले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली असून, या सोडतीसाठी राज्यातील सर्व प्रमुख राजकीय पक्षांना पत्र पाठवले आहे. त्यामुळे राज्यासह भंडारा जिल्ह्यातील भंडारा, पवनी, तुमसर व साकोली या चार नगरपरिषदेत सोमवारी नगराध्यक्ष पदांच्या आरक्षणाचा नवा अध्याय ठरणार आहे.

दरम्यान, राज्यातील २४७ नगरपरिषद आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात ही सोडत पार पडणार आहे. मंत्रालयातील सुरक्षा व्यवस्थेच्या कारणास्तव प्रत्येक पक्षाला केवळ दोन प्रतिनिधी पाठवण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे पक्षांच्या राजकीय नेत्यांचे या सोडतीकडे लक्ष लागले आहे.

मार्च २०२२ पासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक राज सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या निवडणुका जानेवारी अखेरपर्यंत घेण्याचे नियोजन राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

दोन टप्प्यांत या निवडणुका पार पडणार असून, पहिल्या टप्प्यात जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपालिका आणि नगरपरिषदांचा समावेश असेल. दिवाळीतच निवडणुकांचा बिगुल वाजणार असल्याचे सूत्रांकडून समजते. सोमवारी होणारी ही सोडत आणि त्यानंतरचे निवडणूक बिगुल राज्याच्या राजकीय भविष्यातील नवा अध्याय ठरवणार, अशी चर्चा सध्या सुरू आहे.

नगराध्यक्ष पदांच्या निवडीच्या पद्धतीतही महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. २०१९ नंतर नगराध्यक्षांची निवड नगरसेवकांच्या बहुमताने केली जात होती. मात्र आता पुन्हा थेट जनतेतून नगराध्यक्ष निवडले जाणार आहेत. त्यामुळे मतदारांचा कौल निर्णायक ठरणार असून निवडणुकांतील राजकीय समीकरणे मोठ्या प्रमाणात बदलण्याची शक्यता आहे.

### पंचायत समितीच्या सभापती पदाची आरक्षण सोडत आज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत येणा-या १३ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक -२०२५ करीता महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रान्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती नियम १९६२ च्या तरतुदीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासप्रवर्ग आणि महिलांकरीता सभापती पदाचे आरक्षण निश्चित करावयाचे आहे. त्यानुसार नागपूर जिल्हयातील १३ पंचायत समित्याकरीता सभापती पदाचे आरक्षणाची सोडत सोमवार दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ११ वा. बचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर येथे होणार आहे.

# गांधी विचारांवर प्रश्नमंजुषा आणि वादविवाद स्पर्धाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

गांधी जयंतीनिमित्त, एस.बी. जैन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट अँड रिसर्च (एसबीजेआयटीएमआर) येथील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाने समकालीन जगात गांधीवादी विचारांची प्रासंगिकता या विषयावर एक आकर्षक प्रश्नमंजुषा आणि वादविवाद आयोजित केला. दुपारी १:३० ते ३:४५ या वेळेत ऑफलाइन झालेल्या या कार्यक्रमात संस्थेच्या विविध विभागांमधील ६० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये गांधीवादी तत्त्वांची जाणीव यशस्वीरित्या वाढवली, त्यांना आजच्या समकालीन जगात महात्मा गांधींच्या तत्वज्ञानाच्या प्रासंगिकतेवर चिंतन करण्यास प्रोत्साहित केले, तसेच टीमवर्क, सार्वजनिक भाषण आणि विश्लेषणात्मक विचारसरणीला प्रोत्साहन दिले. या वादविवादामुळे विद्यार्थ्यांसाठी त्यांचे टीकात्मक विचार, स्पष्टीकरण आणि प्रेरक भाषण कौशल्ये प्रदर्शित करण्यासाठी एक गतिमान व्यासपीठ म्हणून काम केले, तसेच त्यांचा आत्मविश्वास आणि एकूणच व्यक्तिमत्व विकास वाढला.

# नागपूर महापालिका निवडणूक

## बहादुरा हटवला, प्रभागांमध्ये सूक्ष्म फेरबदल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

महापालिकेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तयार करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर नागरिक, माजी नगरसेवक व राजकीय पक्षांकडून एकूण ११५ आक्षेप नोंदविण्यात आले होते. या आक्षेपांवर निवडणूक आयोगाने सुनावणी घेतली असून काही किरकोळ बदल करून अंतिम प्रभाग रचना जाहीर केली आहे. मात्र, बहादुरा हा वादग्रस्त ग्रामीण भाग शहरात समाविष्ट करण्याच्या निर्णयावर आक्षेप नोंदवल्यावर तो तो वगळण्यात आला आहे.

महापालिका निवडणूक पुढील वर्षी जानेवारीत होण्याची शक्यता आहे. त्यासाठी प्रभाग रचना निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे इच्छुकांना त्यांच्या प्रभागाबाबत स्पष्टता येण्यास मदत होणार आहे. दरम्यान, भाजपचे माजी नगरसेवक विजय उर्फ पिंटू झलके यांनी प्रभाग क्रमांक २८ संदर्भात आक्षेप घेतला होता. त्यांच्या मते, दिघोरी आणि वाठोडा या भागांचे सीमांकन चुकीचे करण्यात आले असून वाठोड्याच्या ५० घरांमधील २०० मतदारांना प्रभाग २८ मध्ये सामील करण्यात आले आहे. यासोबतच बहादुरा सारख्या ग्रामीण भागाला दिघोरीमध्ये दाखवून प्रभाग २८ मध्ये समाविष्ट करण्यात आल्याने चुकीची रचना तयार झाली आहे.

या भागाची प्रत्यक्ष पाहणी करून नव्याने सीमारेषा निश्चित करण्यात याव्यात, अशी त्यांची मागणी होती. यावर आयोगाने बहादुराचा भाग वगळण्याचा निर्णय घेतला असून, प्रभाग २८ च्या दक्षिणेकडील ग्रामीण हद्दीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

भाजपचे आमदार कृष्णा खोपडे यांनी शेवटच्या दिवशी विधानसभा मतदारसंघांच्या आधारावरच प्रभागरचना करावी, अशी भूमिका मांडली होती. यामुळे नागरिकांना व लोकप्रतिनिधींना कार्यवाही करताना अधिक सुसूत्रता राहील, असे त्यांचे म्हणणे होते. मात्र, या हरकतीची दखल घेतली गेली नाही.

दरम्यान, काँग्रेसचे विधानपरिषद सदस्य ॲड. अभिजीत वंजारी यांनी प्रभाग क्रमांक २६ आणि २७ बाबत आक्षेप घेतले होते. त्यांनी सुमारे सात हजार लोकसंख्या असलेले क्षेत्र प्रभाग २६ मधून काढून २७ मध्ये समाविष्ट करण्याची मागणी केली होती.

मात्र, ही तक्रारही आयोगाने फेटाळली. अंतिम प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर काही असंतोष शिल्लक असला तरी बहुतेक आक्षेपांची दखल न घेता ती लागू करण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेसाठी आता पुढील टप्प्यांना वेग मिळणार आहे.

# महाअष्टमी निमित्त मोहन भागवत यांनी केली माँ कालीची पूजा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

महाअष्टमीच्या पावन दिवशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक सर मोहनजी भागवत यांनी कालीबारी संघ, लष्करीबाग येथे भेट देऊन माँ कालीची आरती व पूजा-अर्चना केली. संपूर्ण परिसरात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण पसरले होते.

या कार्यक्रमास डॉ. रतन रॉय (अध्यक्ष), दीपंकर पाल (सचिव), प्रदीप कुंडु (कोषाध्यक्ष), शिशिर कंजिलाल, सुभ्रतो डे, बिस्वजित डे, सुकांता रॉय, त्रिदीप गुहा, एन. के. बगुली, कृष्णा लोध, सतान मित्रा, रतन मित्रा, फेलुराम कोयल, गौतम बोस, सुभाशीष भट्टाचार्य, अजय मुखर्जी, डॉ. सजल मित्रा, सुनील मित्रा आणि प्रदीप मोइत्रा तसेच नागपूरकर भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माँ कालीच्या जयघोषांनी वातावरण दुमदुमून गेले होते. भक्तांनी श्रद्धा, भक्तीभाव आणि उत्साहाने महाअष्टमी साजरी केली व माँ कालीकडे सुख, शांती, समृद्धी आणि राष्ट्राच्या प्रगतीची प्रार्थना केली.

# माजी नगराध्यक्ष एहेतेशाम अली यांची काँग्रेस पक्षामध्ये घर वापसी

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. ५ :

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तसेच सोमवार ६ ऑक्टोबर रोजी नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर होणार असताना वरोरा नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष एहेतेश्याम अली यांची तब्बल ११ वर्षानंतर काँग्रेस पक्षात घरवापसी झाली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार प्रतिभा धानोरकर यांचे उपस्थितीत नागपूर येथे त्यांनी एका समारंभात अली यांनी काँग्रेस पक्ष प्रवेश केला. त्यांच्या काँग्रेसमध्ये येण्याने पक्षाला बळकटी मिळणार असे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.



एहेतेश्याम अली हे स्व.संजय देवतळे यांचे कट्टर समर्थक होते. संजय देवतळे यांना २०१४ मध्ये काँग्रेसने विधानसभा तिकीट नाकारल्या नंतर त्यांनी भाजपात प्रवेश घेऊन भाजपाचे तिकीटवर विधानसभा निवडणूक लढली त्यात ते पराभूत झाले. त्याचवेळी अली हे सुद्धा भाजपावासी झाले. संजय देवतळे यांच्या नेतृत्वात सन २०१६ मध्ये पार पडलेल्या वरोरा नगर परिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष म्हणून अली भाजपचे उमेदवार म्हणून विजयी झालेत. नगराध्यक्षांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक लोकोपयोगी कार्य करून आपली प्रतिमा जनमानसात निर्माण केली. संजय देवतळे यांच्या निधनानंतर ते भाजप सोबत एकनिष्ठ होते. मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी भाजपतर्फे विधानसभेची उमेदवारी मागितली परंतु त्यांना नाकारण्यात आली. तेव्हा त्यांनी बच्चू कडू यांच्या प्रहार पक्षातर्फे आमदारची निवडणूक लढवली.

त्यात त्यांनी चौथ्या क्रमांकाची मते घेतली. अली यांनी विधानसभेत भाजपा सोबत बंडखोरी केल्यानंतर त्यांनी स्वतःला भाजपापासून दूर केले. अखेर ५ ऑक्टोबरला नागपूर येथील एका कार्यक्रमात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश घेऊन तब्बल ११ वर्षांनी परत काँग्रेसवासी झालेत.

# व्हेरायटी चौक ते संविधान चौक मशाल शांती मार्च

## सोनम वांगचुक आणि लडाखचा सहाव्या अनुसूचीत समावेश करावे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

समाजातील सर्व स्तरातील ३०० हून अधिक नागरिकांनी गांधीवादी कार्यकर्त्या सोनम वांगचुक यांच्याशी अढळ एकता आणि लडाखचा सहाव्या अनुसूचीत समावेश करण्याच्या न्याय्य मागणीसाठी अटल एकता दर्शवत एका शक्तिशाली 'मशाल शांती मार्च'मध्ये अनेक संघटनानी सहभाग घेत व्हेरायटी चौक ते संविधान चौक मशाल शांती मार्च काढण्यात आला होता.




रात्रीची हवा केवळ मशालींच्या तेजानेच नव्हे तर न्याय, पर्यावरण संरक्षण आणि संवैधानिक हक्कांसाठीच्या ज्वलंत उत्कटतेने देखील उजळून निघाली. प्रकाश आणि दृढनिश्चयाची एक सजीव नदी असलेला हा मार्च ऐतिहासिक व्हेरायटी स्क्वेअरमधील गांधी पुतळ्यापासून सुरू झाला, ज्यामध्ये वांगचुक यांनी मांडलेल्या शांततापूर्ण निषेधाच्या पद्धतींचे मूर्त स्वरूप होते आणि कॉन्स्टिट्यूशन स्क्वेअर येथे एका शक्तिशाली मेळाव्यात संपला - आपल्या संविधानाच्या वेदीला खरी श्रद्धांजली. सोनम वांगचुक सारख्या खऱ्या राष्ट्रीय नायकाला "राष्ट्रविरोधी" असे लेबल लावण्याचे धाडस करणाऱ्या काही प्रचारकांना हे प्रचंड सार्वजनिक निदर्शने जबरदस्त धक्का होती. नागपूरच्या नागरिकांनी एकमताने या निराधार आणि द्वेषपूर्ण आरोपांचा निषेध केला आणि म्हटले की त्यांचे २१ दिवसांचे उपोषण आणि शांततापूर्ण वकिली महात्मा गांधींच्या उत्तम परंपरांनुसार आहे. लंडाखसाठी सहाव्या अनुसूचीची मागणी करतोअशा घोषणा शहराच्या मध्यभागी गुंजल्या, ज्यामुळे अढळ पाठिंबाचे वातावरण निर्माण झाले होते. मुख्य मागण्यांमध्ये वांगचुकची तात्काळ सुटका आणि लडाखला राज्याचा दर्जा देण्याचे सरकारचे वचन आणि त्याच्या नाजूक पर्यावरणाचे आणि अद्वितीय आदिवासी संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या सहाव्या अनुसूचीच्या संवैधानिक संरक्षणाची त्वरित पूर्तता होती.

हा मोर्चा अभूतपूर्व यश होता, जो शहराच्या जाणीवेचा आणि राष्ट्रीय हितसंबंधांप्रती असलेल्या वचनबद्धतेचा पुरावा होता. याने देशभर एक स्पष्ट संदेश दिलाः भारतातील लोक सोनम वांगचुकमध्ये एक देशभक्त पाहतात आणि गांधींचे आदर्श आणि संविधान धोक्यात आल्यावर नागपूरचे लोक गप्प बसणार नाहीत.